मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : ३ | अंक : ३१० | गुरुवार, २३ जुलै २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ४ | RNI MAHMAR/2023/89514

# जंतरमंतरवरील आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी वंचितच्या वतीने 23 जुलै रोजी 'महाराष्ट्र बंद' ची हाक

**छत्रपती संभाजीनगर :** दिल्लीतील जंतरमंतरवर शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी जमलेल्या विद्यार्थ्यांचे आंदोलन सरकारला संवेदनशीलपणे हाताळता आले असते. पण तसे झाले नाही. पोलिसांनी लाठीमार तर केलाच अगदी बंदूकही चालवली. केवळ एका मंत्र्याला वाचविण्यासाठी सुरू असणारी कसरत निषेधार्ह आहे. यातून लोकशाहीचे खच्चीकरण होत असल्याचे दिसून येत आहे. याचा निषेध नोंदिवण्यासाठी २३ जुलै रोजी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने ' महाराष्ट्र बंद' ची हाक दिली आहे.आपापल्या मुलांचे भवितव्य जपायचे असेल तर सर्वांनी पक्ष, संघटना, विचारधारा या सर्वांना बाजूला ठेवून बंदमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे प्रवक्ते सिद्धार्थ मोकळे यांनी मंगळवारी केले.दिल्लीतील जंतरमंतरवर होणाऱ्या आंदोलनाचे नेतृत्व छत्रपती संभाजीनगरचे अभिजीत दिपके करत आहे. त्यामुळे मराठवाड्यातून या तरुणांना समर्थन देण्यासाठी बंद यशस्वी व्हावा म्हणून प्रयत्न केले जात आहे. शहरातील क्रांती चौकात नुकत्याच झालेल्या आंदोलनात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी , स्पर्धा परीक्षांचे उमेदवार सहभागी झाले होते. शिक्षण व्यवस्थेत बदल



करावेत अशी विद्यार्थ्यांची मागणी रास्त आहे की नाही, हे पालकांनी स्वत:ला विचारावे आणि ' बंद ' मध्ये सहभागी व्हावे असे आवाहन प्रवक्ते मोकळे यांनी केले आहे. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने विद्यार्थ्यांच्या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. कारण गेल्या काही वर्षापासून शिक्षण व्यवस्थेलाच कीड लागली आहे. ज्या शैक्षणिक संस्थामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो तिथे शिकवलेच जात नाही. शिकवणी वर्गाचा सर्वत्र सुळसुळाट आहे. या विरोधात हा बंद आहे. विद्यार्थ्यांच्या रास्त मागण्यांना पाठिंबा देण्याची हीच वेळ असल्याने आणि सत्ताधाऱ्यापर्यंत त्यांचा आवाज पोहचावा म्हणून हे आंदोलन हाती घेतले असल्याची भूमिका वंचित बहुजन आघाडीच्या वतीने मांडण्यात आली.

राज्यातील बहुतांश विरोधी पक्षातील नेत्यांनी आता दिल्ली येथे जात आंदोलनास समर्थन दिले. वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीही अभिजीत दिपके यांची भेट घेतली. उद्धव ठाकरे, शरद पवार यांनीही आंदोलनास भेट दिली. या आंदोलनास पाठिंबा देत वंचित बहुजन आघाडीने महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेलमध्ये रक्तदान शिबिर; आ. प्रशांत ठाकूर यांचे रक्तदान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : महाराष्ट्राचे अष्टपैलू, कार्यकुशल आणि विकासाभिमुख लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर विविध समाजोपयोगी उपक्रम उत्साहात राबविण्यात आले. या निमित्ताने पनवेलमध्ये भाजप पूर्व मंडलाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरात भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस तथा आमदार प्रशांत ठाकूर यांनी रक्तदान करून समाजसेवेचा प्रेरणादायी संदेश दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने विकासाची नवी उंची गाठली असून, पायाभूत सुविधा, उद्योग, गुंतवणूक, रोजगार, शेती, महिला सक्षमीकरण आणि सुशासन या प्रत्येक क्षेत्रात राज्याने उल्लेखनीय प्रगती केली आहे. राज्यातील महिला त्यांना प्रेमाने 'देवा भाऊ' म्हणून संबोधतात, तर पायाभूत सुविधांच्या विकासाला दिलेल्या अभूतपूर्व गतीमुळे त्यांची 'विकसित महाराष्ट्राचे इन्फ्रा मॅन' अशी ओळख निर्माण झाली आहे.



महाराष्ट्राला २०४७ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनविण्याचे महत्त्वाकांक्षी ध्येय ठेवत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यासमोर 'विकसित महाराष्ट्र २०४७' हा दूरदर्शी विकास आराखडा मांडला आहे. जागतिक स्पर्धा, तंत्रज्ञानातील वेगवान बदल, हवामान बदल, वाढते शहरीकरण आणि बदलत्या आर्थिक आव्हानांचा विचार करून तयार करण्यात आलेला हा आराखडा केवळ आर्थिक विकासापुरता मर्यादित नसून रोजगारनिर्मिती, उद्योगविकास, आधुनिक शेती, तंत्रज्ञान, पर्यटन, महिला सक्षमीकरण, गुणवत्तापूर्ण शिक्षण, मजबूत पायाभूत सुविधा आणि पारदर्शक सुशासनाचा व्यापक संकल्प आहे. पुढील पिढ्यांसाठी समृद्ध, सक्षम, आधुनिक आणि आत्मनिर्भर महाराष्ट्र घडविण्याची ताकद या व्हिजनमध्ये आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून भाजप पूर्व मंडलाच्या वतीने मंडल अध्यक्ष तथा पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुकापूर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात आमदार प्रशांत ठाकूर यांनी रक्तदान करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समाजहिताच्या विचारांना कृतीत शुभेच्छा दिल्या. त्यांच्या प्रेरणेने भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक आणि नागरिकांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान करत सामाजिक बांधिलकी जपली. यावेळी दुपारपर्यंत ७३ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

यावेळी पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, जिल्हा परिषद सदस्या प्राची जाधव, जिल्हा परिषद सदस्या कमला देशेकर, पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील, पंचायत समिती सदस्या वर्षा केवारे, वैशाली सावंत, योगिता लहाने, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, किशोर सुरते, सरपंच प्रमोद भिंगारकर, विभागीय अध्यक्ष सुनिल पाटील, विश्वास भगत, माजी सरपंच रमेश पाटील, अनेश ढवळे, विलास शेळके, विश्वजित पाटील, महेश पाटील, राजेश माळी, मुकेश फडके, शरद गायकर, प्रशांत गांगुर्डे, यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरातून समाजाप्रती असलेली बांधिलकी, सेवा आणि समर्पणाची भावना अधोरेखित झाली. रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमातून अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळणार असून, देवाभाऊंच्या वाढदिवसाचे औचित्य समाजसेवेच्या माध्यमातून साजरे करण्याचा हा उपक्रम विशेष ठरला.

## पनवेल कृषी उत्पन्न बाजार समिती सभापतीपदी देवेंद्र गंगाराम मढवी यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्याच्या प्रगतशील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गणल्या गेलेल्या पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी 22 जुलै रोजी देवेंद्र गंगाराम मढवी यांची बिनविरोध निवड झाली. यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील, माजी सभापती नारायणशेठ घरत, पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे महाराष्ट्र राज्य खजिनदार अतुल म्हात्रे, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक उपसभापती सुनील सोनावळे, सचिव प्रकाश नाईक, प्रताप हातमोडे, अशोक गायकर, बाळकृष्ण पाटील, रामचंद्र पाटील, सखाराम पाटील, अर्जुन गायकर, ललिता फडके, महादू पाटील, देवेंद्र पाटील, मच्छिंद्रनाथ पाटील, दिनेश महाडिक, आतिश पाटील उपस्थित होते.

ही निवड प्रक्रिया जिल्हा उप निबंधक तनवीर पाटील अलिबागयांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सभापती पदासाठी एकच नाव आल्यामुळे देवेंद्र गंगाराम मढवी हे सभापतीपदी बिनविरोध झाल्याचे त्यांनी जाहीर केले. पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव प्रकाश नाईक यांनी यावेळी ही निवडणूक पार पाडण्यासाठी विशेष सहकार्य केले. यावेळी कोकण शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार आणि शेकापचे



नेते बाळाराम पाटील यांनी सांगितले की, भविष्यकाळात पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीची वाटचालीमध्ये भरीव कामगिरी करण्यासाठी आम्ही नेते मंडळींनी नवीन तरुण कार्यकर्त्यांना संधी देण्याचे निश्चित केले आणि याचसाठी देवेंद्र मढवी यांची सभापतीपदी निवड करण्यात आली. आणि पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भरभराटीसाठी हे नूतन संचालक मंडळ मेहनत घेतील. नवनिर्वाचित सभापती देवेंद्र मढवी यांना शुभेच्छा देताना काशिनाथ पाटील यांनी सांगितले की, शेतकरी कामगार पक्षांमध्ये नेहमीच कार्यकर्त्यांचा मान राखला जातो. गंगाराम मढवी हे शेकापचे एकनिष्ठ कार्यकर्ते होते, आणि त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून त्यांचे सुपुत्र देवेंद्र गंगाराम मढवी हे पक्षाचे काम निष्ठेने करत आहेत. जेव्हा त्यांच्यावर एखादी जबाबदारी टाकली जाते ते पूर्ण करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्न करतात आणि ते काम पूर्ण झाल्याशिवाय राहत नाही असा त्यांचा काम करण्याचा हातखंड असल्यामुळेच आम्ही लोकांनी त्यांची सभापती या पदासाठी निवड केली.




## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पनवेलमध्ये भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : पनवेल तालुक्यातील बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना, पनवेल तालुक्याच्या वतीने भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा २५ जुलै २०२६, शनिवारी सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या वेळेत स्पाईस वाडी बँक्वेट हॉल, आयडी सर्कल, सुकापूर, नवीन पनवेल येथे पार पडणार आहे.




या रोजगार मेळाव्यात डी. बी. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ (नवी मुंबई), भारतीय रेल्वे तसेच पनवेल महानगरपालिका कंत्राटदारांमार्फत होणाऱ्या भरतीसह ४० हून अधिक नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. या माध्यमातून ३,००० हून अधिक युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून विविध शैक्षणिक पात्रतेनुसार उमेदवारांची निवड केली जाणार आहे.

पनवेल तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, आवश्यक कागदपत्रांसह वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी कोणतेही नोंदणी शुल्क किंवा प्रवेश शुल्क आकारले जाणार नसून सहभाग पूर्णपणे मोफत आहे.

या उपक्रमाचे आयोजन महाराष्ट्र नवनिर्माण सेना – पनवेल तालुका यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून, सुकापूर विभाग अध्यक्ष विकसन नाईक हे मेळाव्याचे संयोजक आहेत.

अधिक माहितीसाठी संपर्क : ९८२०८५७८६३.

## पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाची सर्वसाधारण बैठक संपन्न



**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी)** : सक्रिय पत्रकारांची नोंदणीकृत संस्था असणाऱ्या पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाची मासिक सर्वसाधारण बैठक राजेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दिनांक २२ जुलै रोजी पनवेलच्या शासकीय विश्रामगृह येथे संपन्न झाली. आगामी काळातील पर्यावरण पूरक कार्यक्रम आणि नियोजनाचे बाबत सदर बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली. बैठकीच्या प्रारंभी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंती बद्दल त्यांना अभिवादन करण्यात आले. युवक क्रांती दलाचे संस्थापक डॉक्टर कुमार सप्तर्षी यांचे नुकतेच निधन झाल्याबद्दल पनवेल तालुका पत्रकार मंचाच्या सदस्यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री सन्माननीय देवेंद्र फडणवीस यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. मंचाचे सदस्य असणारे लालचंद यादव यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने केक कापण्यात आला.पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने आगामी काळामध्ये पर्यावरण पूरक कार्यक्रम हाती घेतलेले आहेत. इको फ्रेंडली गणेश, वृक्ष संवर्धन, वृक्ष वाटप, बहुवार्षिक देशी वृक्षांचे बीजारोपण अशा अनेक कार्यक्रमांच्या नियोजनासंदर्भात चर्चा करण्यात आली. मंचाच्या परंपरेत नुसार आयोजित करण्यात येणाऱ्या वर्षा सहलीचे नियोजन देखील या बैठकीत करण्यात आले. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या सर्वसाधारण बैठकीला अध्यक्ष राजेंद्र पाटील, उपाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, सरचिटणीस हरेश साठे, सल्लागार विवेक पाटील, सल्लागार संजय कदम, सल्लागार मंदार दोंदे, निलेश सोनावणे, प्रवीण मोहोकर, लालचंद यादव यांची उपस्थिती होती.

# दडपशाहीचा आणि भ्रष्ट कारभाराचा तीव्र निषेध करण्यासाठी पनवेलमध्ये धरणे आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : NEET परीक्षेतील महाघोटाळ्यामुळे देशातील लाखो हुशार विद्यार्थ्यांचे स्वप्न आणि भविष्य आज अंधारात ढकलले गेले आहे. या ऐतिहासिक भ्रष्टाचाराची आणि निष्काळजीपणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने आपल्या पदाचा राजीनामा दिलाच पाहिजे. यासोबतच, विद्यार्थ्यांचा आणि जनतेचा बुलंद आवाज बनून त्यांच्या हक्कासाठी लढणारे लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर झालेली अन्यायकारक पोलीस कारवाई ही हुकूमशाहीचा कळस आहे. या दडपशाहीचा आणि भ्रष्ट कारभाराचा तीव्र निषेध करण्यासाठी 22 जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक, पनवेल येथे माजी जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष




हेमराज म्हात्रे यांच्या नेतृत्वात 'भव्य धरणे आंदोलन' पार पडले. यावेळी रायगड जिल्हा काँग्रेसचे विधी सेलचे जिल्हाध्यक्ष ॲड के एस पाटील, पनवेल महानगर पालिकेचे नगरसेवक हरीश केणी, नगरसेवक जनार्दन पाटील, नगरसेवक लतीफ शेख, नगरसेवक तुषार पाटील, नगरसेवक राम पाटील, नगरसेविका लीला कातकरी, महादेव कटेकर, माजी तालुकाध्यक्ष, पनवेल शहराध्यक्ष डॉ अमित दवे, कामोठे शहर अध्यक्ष जयेश लोखंडे, ॲड विक्रांत घरत, युवासेनेचे अवचित राऊत, ओबीसी जिल्हाध्यक्ष वैभव पाटील, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष नौफिल सय्यद, महिला जिल्हाध्यक्ष निर्मला म्हात्रे, इशिका सुधिजा, प्रेमा आप्पाचा, नीता शेनॉय, युवक काँग्रेसचे पनवेल विधानसभा अध्यक्ष विश्वजीत पाटील, प्रदेश सचिव प्रशांत पारवे, काशिफ इमाम, सोशल मीडिया प्रदेश उपाध्यक्ष अभिजित पाटील, सुधीर मोरे, अम्मार मदार, रूपेश घरत, विलास दरे, कपिल यादव, शाहिद मुल्ला, वसीम पटेल, दीपक सुधीजा,जयश्री खटकले,दीपा ढोले, आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# गणेशोत्सवात कोकणवासीयांना दिलासा

## पनवेलच्या नवीन प्लॅटफॉर्मवरून धावणार विशेष रेल्वेगाड्या

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या लाखो चाकरमान्यांना दिलासा देण्यासाठी पनवेल रेल्वे स्थानकावरील नवीन मेल-एक्सप्रेस प्लॅटफॉर्मचे काम युद्धपातळीवर सुरू असून, ते १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण करून प्रवाशांच्या सेवेत दाखल करण्यात येईल, असे आश्वासन मध्य रेल्वेच्या उपमुख्य अभियंता (बांधकाम) सुमन यांनी महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांना दिले.

यासंदर्भात महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाच्या शिष्टमंडळाने रेल्वे अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. या निवेदनात गणेशोत्सवाच्या काळात मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि परिसरातून कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची प्रचंड गर्दी लक्षात घेऊन पनवेलच्या नवीन प्लॅटफॉर्मवरून विशेष गणेशोत्सव रेल्वेगाड्या सुरू करण्याची मागणी करण्यात आली.

सध्या पनवेल स्थानकावर नवीन मेल-एक्सप्रेस प्लॅटफॉर्म तसेच लोकल प्लॅटफॉर्मच्या उभारणीचे काम




वेगाने सुरू आहे. हे काम वेळेत पूर्ण झाल्यास गणेशोत्सवाच्या काळात विशेष रेल्वेगाड्यांचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येणार असून, हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाने पनवेलहून चिपळूण, रत्नागिरी आणि सावंतवाडी रोड या प्रमुख कोकण मार्गांवर विशेष रेल्वेगाड्या चालविण्याची मागणी केली आहे. प्राथमिक नियोजनानुसार ८ सप्टेंबर ते २० सप्टेंबर २०२६ या कालावधीत या विशेष गाड्या चालविण्याचा प्रस्ताव असून, पनवेल–चिपळूण विशेष गाडी सायंकाळी ६.०० वाजता, पनवेल–रत्नागिरी विशेष गाडी सायंकाळी ७.०० वाजता आणि पनवेल–सावंतवाडी रोड विशेष गाडी रात्री ८.०० वाजता सुटण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या गाड्यांचे अंतिम वेळापत्रक रेल्वे प्रशासनाकडून लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

गणेशोत्सवात दरवर्षी कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. अनेकांना आरक्षण मिळत नसल्याने मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे अतिरिक्त विशेष रेल्वेगाड्या सुरू झाल्यास हजारो कोकणवासीयांना आणि चाकरमान्यांना सुरक्षित, सुलभ व आरामदायी प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल, असा विश्वास महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाने व्यक्त केला आहे.

यावेळी महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाचे सल्लागार तथा कोकण रेल्वेचे संस्थापक सदस्य सुरेंद्र हरिश्चंद्र नेमळेकर, नवी मुंबई-ठाणे युनिट अध्यक्ष गणेश परब आणि पनवेल अध्यक्ष विक्रम येलवे उपस्थित होते. त्यांनी रेल्वे प्रशासनाचे आभार मानत, नवीन प्लॅटफॉर्मचे काम नियोजित मुदतीत पूर्ण करून गणेशोत्सवापूर्वी विशेष रेल्वेगाड्यांची अधिकृत घोषणा करावी, अशी मागणी केली.

# शिवसेना प्रणित जय महाराष्ट्र माथाडी आणि जनरल कामगार सेनेच्या मावळ लोकसभा क्षेत्राच्या उपाध्यक्षपदी जगदीश ठाकूर यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : शिवसेना प्रणित जय महाराष्ट्र माथाडी आणि जनरल कामगार सेनेच्या मावळ लोकसभा क्षेत्राच्या उपाध्यक्ष या पदावर जगदीश ठाकूर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. ही नियुक्ती मुख्यनेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने करण्यात आली असून, मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या सहकार्याने ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. तसेच संघटनेचे अध्यक्ष डेव्हिड जेरी आणि उपाध्यक्ष राजा ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती जाहीर करण्यात आली.

जगदीश ठाकूर हे संघटनात्मक कामात सक्रिय, मेहनती आणि कामगारांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील नेतृत्व म्हणून



ओळखले जातात. त्यांच्या निवडीमुळे मावळ लोकसभा क्षेत्रातील माथाडी आणि सर्वसाधारण कामगारांना एक सक्षम, तत्पर आणि लढाऊ नेतृत्व मिळाले आहे. कामगारांचे हक्क, त्यांच्या समस्या आणि कल्याणासाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहिले आहेत. या नव्या जबाबदारीच्या माध्यमातून जगदीश ठाकूर हे संघटनेला अधिक बळकट करतील, कामगारांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचवतील आणि त्यांच्या हक्कांसाठी प्रभावीपणे आवाज उठवतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. संघटनेच्या उद्दिष्टांची पूर्तता करताना ते सर्व स्तरांवरील कामगारांना एकत्र आणून त्यांच्यासाठी नवे उपक्रम राबवतील, अशी अपेक्षा आहे. या नियुक्तीबद्दल जगदीश ठाकूर यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून विविध क्षेत्रातून तसेच सर्वच स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समितीतर्फे यथा राजा : नाटकातील कलावंत सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे** : दि. 19 / 07/ 2027 रोजी अमोल कुलकर्णी लिखित व अतुल मेहकरकर दिग्दर्शीत आणि निरामय क्रीएशन प्रस्तुत नाटकाचा 11 वा प्रयोग बुलढाणा येथील सहकार विद्यामंदिराच्या सभागृहात पार पडला. बुलढाणा अर्बन चे सर्वेसर्वा भाईजी श्री. राधेश्याम चांडक यांच्या उपस्थितीत प्रयोगाचे आयोजन करण्यात आले.सुरुवातीला गण नमन गाऊन प्रयोगाची सुरुवात करण्यात आली.

अमोल कुलकर्णी सरांचे अप्रतिम विनोदी लेखन असल्याने ते साहजिकच सुंदरच असणार यात शंका नाही .



सर्वांचेच अभिनय खूप छान झाले.... नेहमीप्रमाणे अतुल मेहकरकर अमोल कुलकर्णी सरांनी आपल्या अभिनयातून विनोदाच्या परफेक्ट जागा शोधल्या व त्या खूपच परीणामकारक वाटल्या... शुभम गवई, राजेश पद्मणे, शैलेश बन्सोड, निकिता मोरे व अश्विन सरदार यांचा अभिनय एकदम प्रो लेव्हलचा वाटला जय मुळे यांनीही आपली भूमिका छानच साकारली कवीचे कॅरेक्टर हे नेहमीच लोकांना भावणारे असते,

रोहण झिने यांचा अभिनय खूपच कमालीचा होता एकंदरीत सर्वात महत्वाचे म्हणजे टाईमिंग सर्वच कलावंतांनी खूप छान साधलंय खळखळून हसायला लावणारा व मन तृप्त करणारा हा प्रयोग खूप आवडला..... "यथा राजा" टीममधील सर्वांचे माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समिती ( भारत सरकार मान्यताप्राप्त ) अमरावती विभागीय संघटक सारंग महाजन यांनी यथा राजा नाटकातील अमोल कुलकर्णी ,अतुल मेहकरकर ,अश्विन सरदार, राजेश पदमने ,शुभम गवई , अभिलाष चौबे, जय मुळे ,रोहन झीने, अभिलाष चौबे, दीपक मोकळे, निकिता मोरे ,नंदिनी मुळे, शैलेश बनसोड, शुभम रोकडे ,पवन बाबरेकर, मयूर परमार या सर्वांना समितीचे सन्मानपत्र पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले. कलाकारांचे अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी मनस्वी शुभेच्छा !

# विसपुते सभागृहात हृदय–फुफ्फुस पुनर्जीवन प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, पनवेल येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) व राष्ट्रीय सेवा योजना (NSS) यांच्या संयुक्त विद्यमाने अपोलो हॉस्पिटल्स यांच्या सहकार्याने २२ जुलै रोजी दादासाहेब धनराज विसपुते सभागृहात हृदय-फुफ्फुस पुनर्जीवन (सीपीआर) प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.अपोलो हॉस्पिटल्समधील अनुभवी वैद्यकीय तज्ज्ञांनी हृदयविकाराच्या आपत्कालीन परिस्थितीत हृदय-फुफ्फुस पुनर्जीवन (सीपीआर) चे महत्त्व स्पष्ट करून प्रत्यक्ष प्रात्यक्षिक व हाताळणीद्वारे विद्यार्थ्यांना जीवनरक्षक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपत्कालीन परिस्थितीला योग्य प्रकारे प्रतिसाद देण्याबाबत



जागरूकता निर्माण झाली. या कार्यक्रमाला १,५०० हून अधिक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. मा. अध्यक्ष श्री. धनराजजी विसपुते, मा. सचिव सौ. संगीता विसपुते यांच्या प्रेरणा व सहकार्याने तसेच प्राचार्य डॉ. आशिष जैन यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाच्या शेवटी अपोलो हॉस्पिटल्सच्या तज्ज्ञांचे, महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाचे, प्राचार्य, प्राध्यापक, स्वयंसेवक तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

# रानवली धरणातील गढूळ पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर; अपूर्ण योजनांचीही चौकशी करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित** : श्रीवर्धन तालुक्यातील रानवली धरणातून रानवली, गालसुरे, निगडी आदी गावांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र पावसाळ्यात धरणातील पाणी मोठ्या प्रमाणात गढूळ होत असल्याने तेच पाणी नागरिकांच्या नळांपर्यंत पोहोचत असल्याची तक्रार नागरिकांकडून व्यक्त होत आहे. अशा गढूळ पाण्याच्या वापरामुळे जलजन्य आजारांचा धोका वाढू शकतो, त्यामुळे नागरिकांच्या



आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.दरम्यान, या परिसरात जलजीवन मिशन योजनांअंतर्गत करण्यात आलेली अनेक कामे अद्याप अपूर्ण असल्याचे सांगितले जात आहे. काही ठिकाणी कामे पूर्ण न झाल्याने संबंधित ग्रामपंचायतींनी ती आपल्या ताब्यात घेतलेली नसल्याचीही माहिती समोर येत आहे. त्यामुळे या अपूर्ण कामांची जबाबदारी निश्चित करून संबंधित ठेकेदारांवर कारवाई का करण्यात आलेली नाही, असा सवाल उपस्थित होत आहे.

तसेच गावातील पाण्याच्या टाक्यांखाली पाणी शुद्धीकरण (फिल्ट्रेशन) यंत्रणा उभारण्याची तरतूद होती का, असल्यास ती का बसविण्यात आली नाही आणि याबाबत संबंधित ग्रामपंचायतींनी प्रशासनाकडे मागणी केली होती का, याचीही सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.


गढूळ व अशुद्ध पाण्यामुळे अतिसार, कावीळ, टायफॉईड, कॉलरा यांसारख्या जलजन्य आजारांचा धोका वाढू शकतो. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने पाण्याची गुणवत्ता तपासून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अपूर्ण कामांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. तसेच रानवली धरणातून होणाऱ्या गढूळ पाण्याच्या पुरवठ्याच्या समस्येवर कायमस्वरूपी आणि प्रभावी उपाययोजना करून नागरिकांना सुरक्षित पाणीपुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# मुरुडमध्ये महा–ई–सेवा केंद्रांकडून जादा शुल्क आकारणी? नागरिकांमध्ये नाराजी; चौकशीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण | मोहम्मद पिंजारी** : महाराष्ट्र शासनाने नागरिकांना विविध शासकीय सेवा सुलभ, पारदर्शक आणि विहित शुल्कात उपलब्ध करून देण्यासाठी राज्यभर महा-ई-सेवा केंद्रांची व्यवस्था सुरू केली आहे. रहिवासी, उत्पन्न, जात, अधिवास, नॉन-क्रिमीलेअर आदी विविध प्रमाणपत्रांसाठी शासनाने निश्चित सेवा शुल्कही निर्धारित केले आहे.

मात्र, मुरुड परिसरातील काही महा-ई-सेवा केंद्रांमध्ये शासनाने निश्चित केलेल्या




शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारली जात असल्याची तक्रार व चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. काही नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही प्रमाणपत्रांसाठी विहित शुल्काऐवजी ₹५०० ते ₹१,००० पर्यंत रक्कम घेतली जात असल्याचा आरोप केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर, शासनाने निश्चित केलेले शुल्क असताना अतिरिक्त पैसे आकारले जात असतील तर त्याची संबंधित विभागाने चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. या प्रकाराचा सर्वाधिक परिणाम गरीब, शेतकरी, विद्यार्थी, बेरोजगार आणि विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे काढणाऱ्या नागरिकांवर होत असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, या प्रकरणात संबंधित महा-ई-सेवा केंद्रांची बाजू जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार असून, त्यांचे स्पष्टीकरण प्राप्त झाल्यास तेही प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, संबंधित महसूल विभाग व जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाची वस्तुस्थिती तपासून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# चाळीशीनंतर पेरिमेनोपॉजच्या तक्रारींमध्ये वाढ

## हार्मोन थेरपीकडे महिलांचा वाढता कल : प्रसुती व स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.सुरभी सिद्धार्थ

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : चाळीशीनंतर महिलांमध्ये पेरिमेनोपॉजशी संबंधित तक्रारी वाढत असून, वेळेवर निदान आणि उपचारांसाठी डॉक्टरांचा सल्ला घेणाऱ्या महिलांची संख्या वाढत असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले आहे. हार्मोनल आरोग्याबाबत वाढती जागरूकता आणि सोशल मीडियावरील माहितीमुळे अनेक महिला हार्मोन रिप्लेसमेंट थेरपी या उपचारपद्धतीकडे वळत आहेत.

खारघर येथील मदरहूड हॉस्पिटलच्या प्रसूती व स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुरभी सिद्धार्थ यांनी सांगितले की, पेरिमेनोपॉज हा रजोनिवृत्तीपूर्वीचा संक्रमणकाळ असून या काळात इस्ट्रोजेन



व प्रोजेस्टेरॉन हार्मोन्सचे प्रमाण कमी होऊ लागते. त्यामुळे अनियमित मासिक पाळी, हॉट फ्लॅशेस, रात्री घाम येणे, झोपेचा त्रास, मूड स्विंग्स, थकवा, चिंता आणि योनीमार्गातील कोरडेपणा अशी लक्षणे दिसू शकतात. उपचारांकडे दुर्लक्ष केल्यास हाडांची झीज, हृदयविकाराचा धोका आणि मानसिक आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात.

त्यांच्या मते, योग्य महिलांमध्ये मुळे लक्षणांवर प्रभावी नियंत्रण मिळते, झोप आणि मानसिक आरोग्यात सुधारणा होते तसेच जीवनमान उंचावते. मात्र, उपचार प्रत्येक महिलेच्या वय, वैद्यकीय इतिहास आणि लक्षणांनुसारच ठरवले जातात. नियमित व्यायाम, संतुलित आहार, पुरेशी झोप आणि ताणतणावाचे व्यवस्थापन यांचाही उपचारांमध्ये महत्त्वाचा वाटा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# समाजसेवा, पत्रकारिता व विविध क्षेत्रांतील कर्तृत्वाला 'मुंबई रत्न'चा बहुमान

## विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा 'मुंबई रत्न पुरस्कार २०२६'ने होणार गौरव

**दैनिक युवक आधार**

**मुंबई | प्रतिनिधी :** युवा महाराष्ट्र फाऊंडेशनच्या वतीने सामाजिक,पत्रकारिता,सांस्कृतिक व विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा "मुंबई रत्न पुरस्कार २०२६" ने गौरव करण्यात येणार आहे.या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवरांची निवड करण्यात आली असून त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात येणार आहे. पुरस्कारासाठी निवड झालेल्या मान्यवरांमध्ये शांताराम गुडेकर,समीर खाडिलकर,सौ. मनस्वी मनवे,मोहन कदम,राजेंद्र भुवड,महेंद्र मनवे,केतन भोज,चंद्रकांत करंबळे,दीपक मांडवकर,जितेंद्र शिंदे,संतोष गावडे आणि सुभाष कोकणे यांचा समावेश आहे.या सर्वांनी आपल्या-आपल्या क्षेत्रात समाजहिताची जपलेली बांधिलकी,लोकसेवा,पत्रकारिता ,सामाजिक कार्य आणि जनजागृतीमधील उल्लेखनीय योगदान लक्षात घेऊन त्यांची निवड करण्यात आल्याची माहिती



आयोजकांनी दिली.पुरस्कार वितरण सोहळा २४ जुलै २०२६ (शुक्रवार) रोजी सायंकाळी ५ वाजता,मेयर हॉल,अंधेरी (मुंबई) येथे संपन्न होणार असून या सोहळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवर,सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.या पुरस्काराच्या माध्यमातून समाजासाठी निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्याचा आणि त्यांच्या कार्याचा सन्मान करण्याचा युवा महाराष्ट्र फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# वाद नव्हे, संवादाची वाट !"

## बेलापूर कौटुंबिक न्यायालयाच्या मध्यस्थी जनजागृती कार्यक्रम अभियानातून सलोखा आणि न्यायाचा संदेश

**दैनिक युवक आधार**

**रायगड प्रतिनिधी रणिता ठाकूर** : कौटुंबिक वाद न्यायालयाच्या दारात पोहोचण्यापूर्वीच संवाद आणि समंजसपणाच्या माध्यमातून मिटले, तर अनेक कुटुंबे तुटण्यापासून वाचू शकतात. हाच मोलाचा संदेश देत कौटुंबिक न्यायालय, बेलापूर, तालुका विधी सेवा समिती, बेलापूर आणि नवी मुंबई वकील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने १८ जुलै २०२६ रोजी 'मध्यस्थी जनजागृती कार्यक्रम' उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान कौटुंबिक न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश मा.सुभाष रंगनाथ कापरे यांनी भूषवीले. यावेळी सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) . प्रविण प्रकाशराव देशमाने, नवी मुंबई वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड सुनिल मोकल यांची प्रमुख



उपस्थिती होती. सदर कार्यक्रमाच्या वेळी . प्रविण प्रकाशराव देशमाने, सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), 'ॲड कृष्णा ठक्कर, प्रशिक्षित मध्यस्थी यांनी उपस्थितांना मध्यस्थी प्रक्रियेचे महत्त्व, तिचे कायदेशीर स्वरूप आणि सामाजिक परिणाम याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

मा. न्यायाधीश सुभाष कापरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "आजच्या डिजिटल युगात कौटुंबिक नात्यांमध्ये अनेक बदल होत आहेत. अशा परिस्थितीत न्यायालयीन लढाईपेक्षा मध्यस्थीच्या माध्यमातून वाद मिटविल्यास वेळ, पैसा आणि मानसिक त्रास मोठ्या प्रमाणात वाचतो. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे नात्यांतील विश्वास आणि आपुलकी जपली जाते. त्यामुळे कौटुंबिक प्रकरणामध्ये मध्यस्थी ही काळाची गरज आहे" कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन ॲड. वंदना दळवी यांनी केले, तर आभार प्रदर्शन .ॲड आकाश पाटील यांनी केले.

यावेळी नवी मुंबई वकील संघटनेचे सदस्य .ॲड तुषार राऊत, .ॲड प्रसाद मढवी, ॲड निलेश पाटील, ॲड हेमांगी पाटील यांची उपस्थिती होती.सदर कार्यक्रमासाठी कौटुंबिक न्यायालयाचे विवाह समुपदेशक भारत काळे, श्रीमती निलोफर लोखंडवाला, कौटुंबिक न्यायालयाच्या प्रबंधक श्रीमती स्वप्नाली चंदन, नवी मुंबई वकील संघटनेचे सदस्य, तालुका विधी सेवा समितीचे कर्मचारी तसेच न्यायालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते व त्यांचे सहकार्य लाभले.

हा जनजागृती उपक्रम केवळ मध्यस्थी कायद्याची माहिती देणारा नव्हता, तर "संवादातून समाधान आणि मध्यस्थीतून न्याय" हा समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा संदेश देणारा ठरला. कौटुंबिक नात्यांमध्ये संवाद, विश्वास आणि समंजसपणा टिकवण्यासाठी मध्यस्थी हीच आजच्या काळाची खरी गरज असल्याचे या कार्यक्रमातून अधोरेखित करण्यात आले.

# स्व. अजितदादा पवार हे केवळ व्यक्तिमत्त्व नव्हते, तर जनसामान्यांच्या हितासाठी कार्य करणारा प्रेरणादायी विचार होते : सरकटे

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे** : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी (दि. २२) तळणी येथे विविध सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरणपूरक उपक्रम उत्साहात राबविण्यात आले. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जालना जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर सरकटे यांच्या पुढाकारातून या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जिल्हा परिषद हायस्कूल तसेच विश्वनाथ विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना शालेय व क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी भंडारेश्वर संस्थान परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच नेमिनाथ महाराज संस्थानातील विद्यार्थ्यांना फळांचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात






आली.

यावेळी बोलताना ज्ञानेश्वर सरकटे म्हणाले, "स्व. अजितदादा पवार हे केवळ व्यक्तिमत्त्व नव्हते, तर जनसामान्यांच्या हितासाठी कार्य करणारा प्रेरणादायी विचार होते. समाजसेवा, लोकाभिमुखता आणि जनहिताची त्यांनी जपलेली परंपरा आमच्यासाठी मार्गदर्शक आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून आम्ही त्यांना अभिवादन केले असून समाजहिताची सेवा आणि जनकल्याणाचा विचार सातत्याने पुढे नेण्याचा आमचा संकल्प आहे."

या प्रसंगी तळणीचे सरपंच गौतम सदावर्ते, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गजानन सरकटे, जिल्हा परिषद हायस्कूलचे बी. के. मुंडकर, विश्वनाथ विद्यालयाचे श्रीकृष्ण लोंढे, माजी उपसरपंच सुधाकर सरकटे, पांडुरंग जनकवार, भागवत मुर्तडकर, अर्चना राऊत, पार्वती मुदळकर, संजय मोरे, जनार्धन आढळकर, दिलीपसिंह गाहीलोद, सतीश सरकटे, महादेव सरकटे, रवि गाडेकर, गणेश गुजर, राम देशमुख, शालिकराम कुकडे, राजू राठोड, निलेश राऊत, स्वप्निल सरकटे, दीपक सरकटे, कैलास आळंदकर, नागेश गुजर, नरसिंग सरकटे, कृष्णा वाघमोडे, गणेश सदावर्ते आदी उपस्थित होते.

# सायन येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जन्मदिवस आणि दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून सायन येथील समाज मंदिर हॉलमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान झाले. या शिबिरात शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती देत पात्र लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. रक्तदान व मोफत वैद्यकीय तपासणी शिबिरांचेही आयोजन यावेळी करण्यात आले.

यावेळी आमदार कॅप्टन आर. तमील सेल्वन, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, अप्पर जिल्हाधिकारी बप्पासाहेब थोरात, निवासी जिल्हाधिकारी शिवनंदा लंगडापुरे उपस्थित होते.

सायन कोळीवाडा हा गरीब घटकांचा मतदारसंघ असून येथे समाधान शिबिर आयोजित केल्याबद्दल आमदार कॅप्टन आर. तमील सेल्वन यांनी प्रशासनाचे अभिनंदन केले. प्रास्ताविकात जिल्हाधिकारी गोयल यांनी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्र समाधान शिबिर' हा उपक्रम लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान प्रशासन नागरिकांच्या दारी पोहोचवण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. हक्कांबरोबरच नागरिकांनी आपली कर्तव्येही पार पाडली पाहिजेत, असे सांगत त्यांनी रक्तदान शिबिरात सहभागी होऊन पावसाळ्यात रक्तपेढ्यांतील तुटवडा कमी करण्याचे आवाहन केले. महिलांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी गोयल यांनी यावेळी केले.

शिबिरामध्ये २९ शासकीय कार्यालयांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी ९ विभागांमार्फत विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यात आला. एकूण ९१ लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे, शिधापत्रिका, क्रीडा साहित्य तसेच विविध योजनांतील लाभ वितरित करण्यात आले. २० विभागांनी नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती, अर्ज प्रक्रिया आणि मार्गदर्शन उपलब्ध करून दिले. समाधान शिबिरात सायन परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला असून, विविध योजनांसाठी मोठ्या प्रमाणावर अर्ज दाखल झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांची तारांगणात विज्ञान सफर

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त नाशिक महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी "चला... विज्ञानाची सफर करूया!" या अभिनव उपक्रमांतर्गत तारांगण, नाशिक येथे शैक्षणिक विज्ञानभ्रमंतीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे आणि अवकाश विज्ञानाबाबत जिज्ञासा वाढविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या विज्ञानभ्रमंतीदरम्यान विद्यार्थ्यांनी तारांगणातील आधुनिक सादरीकरणांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. ग्रह, तारे, आकाशगंगा, विश्वाची निर्मिती, सौरमाला तसेच अवकाशातील विविध घडामोडींची माहिती आकर्षक दृश्य-श्राव्य माध्यमातून





विद्यार्थ्यांना देण्यात आली. विज्ञानातील क्लिष्ट संकल्पना सोप्या आणि मनोरंजक पद्धतीने समजावून सांगितल्याने विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विज्ञान सफरीचा मनमुराद आनंद लुटला.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडण्यासोबतच विज्ञान, संशोधन आणि अवकाश क्षेत्राविषयीची उत्सुकता अधिक वाढल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांसह शिक्षक-शिक्षिकांनीही तारांगणातील विविध सादरीकरणांचा अनुभव घेत विज्ञानाच्या नव्या विश्वाची प्रेरणा घेतली.

कार्यक्रमास भारतीय जनता पक्षाचे नाशिक शहराध्यक्ष सुनीलजी केदार, नवीन नाशिक मंडळाचे पदाधिकारी केतनजी औसरकर, अशोकजी पवार तसेच पवन मटाले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत विज्ञानाधिष्ठित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.नगरसेवक प्रभाग क्र. २५ सुधाकर भाऊ बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नगरसेविका साधना पवन मटाले यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, संशोधनाची वृत्ती आणि विज्ञानाविषयीची आवड जोपासण्यासाठी अशा शैक्षणिक उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचे मत व्यक्त केले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त युवा मोर्चातर्फे श्रमदान, वृक्षारोपण व महाआरती"

**दैनिक युवक आधार**

**गंगाधर कदम {अर्धापूर,} :** महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा अर्धापूर, मुदखेड व नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने अर्धापूर तालुक्यातील मेंढला बु. येथील मेंढला नाला येथे श्रमदान व वृक्षारोपण अभियानाचे आयोजन करण्यात आले. भर पावसात पार पडलेल्या या अभियानाला कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या अभियानाचे उद्घाटन भोकरच्या आमदार श्रीजयाताई चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. तर भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे प्रदेश सचिव तथा नांदेड प्रभारी दत्तप्रसाद जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यावेळी आमदार श्रीजयाताई चव्हाण यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले तसेच उपस्थित मान्यवरांनी श्रमदान करून जलसंवर्धन व पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला.कार्यक्रमास युवा मोर्चा शहराध्यक्ष शशिकांत क्षीरसागर, अर्धापूर युवा मोर्चा तालुकाध्यक्ष पवन पाटील इंगोले, मुदखेड युवा मोर्चा तालुकाध्यक्ष केशव पाटील मुंगल, महिला मोर्चा अध्यक्षा मंगलताई स्वामी, राम आबादार, सरचिटणीस परमेश्वर बंडाळे, उपाध्यक्ष संतोष कदम, ओम बंडेवार, योगेश हळदे, तुकाराम माटे, रमेश लखे, नवनाथ कदम, सचिन कल्याणकर, देवा धबडगे, जठन मूळे, कोंडीबा सूर्यवंशी, ज्ञानेश्वर भरकड, दादाराव अडकीने, संभाजी शिंदे, राम गवंडेवाड, संदीप भोकरे, सुभाष धबडगे, साईनाथ गव्हाणे, नरोजी आढाव, प्रकाश खुराडे, अंकुश कदम, हज्जू महाराज, बाबुराव क्षीरसागर, अनिकेत कदम, चंद्रकांत कदम, खंडेराव हाके, व्यंकटी कणगीरे यांच्यासह युवा मोर्चा, महिला मोर्चा व भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याच निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना निरोगी व उदंड आयुष्य लाभावे, अशी प्रार्थना करत अर्धापूर युवा मोर्चाच्या वतीने गणपूर येथील ओंकारेश्वर महादेव मंदिरात महाआरतीचे आयोजन करण्यात आले. भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव तथा नांदेड प्रभारी दत्तप्रसाद जाधव यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. या प्रसंगी शहराध्यक्ष शशिकांत क्षीरसागर, तालुकाध्यक्ष पवन पाटील इंगोले, मुदखेड तालुकाध्यक्ष केशव पाटील मुंगल, सरचिटणीस परमेश्वर बंडाळे, उपाध्यक्ष संतोष कदम, ओम बंडेवार, सचिन कल्याणकर, कोंडीबा सूर्यवंशी, रमेश लखे, नवनाथ कदम, देवा धबडगे, संभाजी शिंदे, साईनाथ गव्हाणे, नरोजी आढाव, संदीप भोकरे, राम आबादार, बाबुराव क्षीरसागर, चंद्रकांत कदम, अनिकेत कदम, खंडेराव हाके, व्यंकटी कणगीरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# रायगडच्या शाळा नादुरुस्त, निधी मात्र निवडक गावांत?; रेवदंड्यातील वरजीवनदास भन्साळी शाळा जमीनदोस्त प्रकरणाने खळबळ

### ३१५ शाळा दुरुस्तीच्या प्रतीक्षेत, ९७१ शिक्षक पदे रिक्त, २९ शाळा बंद; आर टीआय मधून निधी वाटपावर प्रश्नचिन्ह – रेवदंडा शाळा पाडण्यास शासनाची परवानगी होती का? जनतेचा सवाल

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : रायगड जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण व्यवस्थेतील गंभीर विसंगती माहितीच्या अधिकारातून (आर.टी.आय) समोर आल्यानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा नियोजन विभाग आणि संबंधित प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एका बाजूला जून २०२६ पर्यंत जिल्ह्यातील तब्बल ३१५ प्राथमिक शाळा नादुरुस्त अवस्थेत असल्याचे अधिकृत नोंदी दर्शवत आहेत, दुरुस्ती व विकासकामांसाठी सुमारे २५ कोटी ८३ लाख रुपयांची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आले आहे, तर दुसऱ्या बाजूला अनेक शाळांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव, ९७१ शिक्षक पदे रिक्त आणि २९ शाळा बंद पडल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे.या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांनी माहितीच्या अधिकारातून प्राप्त झालेल्या २४६ पानी कागदपत्रांच्या आधारे गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. सावंत यांच्या आरोपानुसार, प्राथमिक शिक्षणासाठी उपलब्ध निधीचा मोठा हिस्सा सत्ताधारी पक्षाच्या प्रभावक्षेत्रातील गावांमध्येच खर्च करण्यात आला असून, काही निवडक शाळांवर दोन ते तीन वेळा निधी मंजूर करण्यात आल्याचे दस्तऐवज दर्शवितात.

आर टी आय मधील माहितीनुसार सन २०२३-२४ ते २०२५-२६ या कालावधीत अलिबाग तालुक्याला सुमारे ४ कोटी १२ लाख रुपयांहून अधिक निधी मंजूर झाला आहे. त्याच्या तुलनेत पनवेलला सुमारे ९० लाख, उरणला ३८.७७ लाख आणि खालापूरला अवघे १० लाख रुपये मंजूर झाल्याची नोंद आहे. त्यामुळे निधी वाटपासाठी कोणते निकष वापरण्यात आले, हा प्रश्न उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे सहाण, कुसुंबळे, कुर्डुस, सारळ, धाकट शहापूर, चौल, वाडगाव यांसारख्या शाळांमध्ये विविध वर्षांत दुरुस्ती, नवीन इमारती, वर्गखोल्या, संरक्षण भिंती, स्वच्छतागृहे अशा कामांसाठी वारंवार निधी मंजूर झाल्याची नोंद आहे. वाडगाव येथे नवीन शाळा इमारतीसाठी ५० लाख रुपये, त्याच गावात दुरुस्तीसाठी आणखी १० लाख रुपये, तर सहाण येथे नवीन शाळेसाठी २० लाख रुपये मंजूर झाल्याची माहिती दस्तऐवजांतून समोर आली आहे. त्यामुळे निधीचा उपयोग खरोखर गरजू शाळांसाठी झाला की निवडक शाळांभोवतीच निधी फिरत राहिला, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे.

मात्र या सर्व प्रकरणात सर्वाधिक चर्चेचा विषय ठरत आहे तो रेवदंड्यातील वरजीवनदास भन्साळी प्राथमिक शाळेचा. स्थानिकांच्या मते ही शाळा जेसीबीच्या सहाय्याने जमीनदोस्त करण्यात आली. परंतु ही कारवाई कोणाच्या आदेशावर करण्यात आली, शाळा पाडण्यासाठी महाराष्ट्र शासनाची किंवा शिक्षण विभागाची लेखी परवानगी होती का, याबाबत अद्याप कोणतेही स्पष्ट उत्तर समोर आलेले नाही.

शाळा ही केवळ इमारत नसून एका पिढीच्या शिक्षणाचा पाया असते. अशा शैक्षणिक वास्तूचा पाडाव करताना कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती का, तांत्रिक अहवाल होता का, शिक्षण विभागाची मंजुरी होती का, ग्रामस्थांची हरकत विचारात घेण्यात आली का, असे अनेक प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

याहून गंभीर बाब म्हणजे या संदर्भात कोकण विभागीय आयुक्तांकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आल्याचे सांगितले जात असले, तरी त्यावर अद्याप कोणतीही ठोस भूमिका किंवा उत्तर समोर आलेले नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे प्रशासनाच्या मौनामुळे संशय अधिकच बळावत असल्याची भावना स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित समस्या, नादुरुस्त शाळा, शिक्षकांची कमतरता आणि निधीअभावी रखडलेली कामे याकडे दुर्लक्ष करून जर निधीचा वापर निवडक ठिकाणीच होत असेल, तर ही बाब केवळ आर्थिक अनियमिततेपुरती मर्यादित राहत नाही, तर ग्रामीण विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणारी ठरू शकते, अशी टीका होत आहे. सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांनी निधी वाटपाची स्वतंत्र चौकशी, प्रत्यक्ष कामांचे तांत्रिक ऑडिट, एकाच शाळांवर वारंवार मंजूर झालेल्या निधीची तपासणी आणि रेवदंड्यातील वरजीवनदास भन्साळी प्राथमिक शाळा जमीनदोस्त करण्यामागील संपूर्ण प्रशासकीय प्रक्रिया सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे.आता या संपूर्ण प्रकरणात महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद प्रशासन आणि कोकण विभागीय आयुक्त कार्यालय कोणती भूमिका घेते, संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित होते का आणि रेवदंडा शाळा पाडण्यामागील सत्य जनतेसमोर येते का, याकडे रायगड जिल्ह्यासह संपूर्ण कोकणचे लक्ष लागले आहे.

# डॉ. प्रशांत विघे यांच्या यवतमाळ जिल्हा प्रचार कार्यालयाचे उद्‌घाटन उत्साहात संपन्न

## 'डॉ. प्रशांत विघे हे दूरदृष्टी, अभ्यास आणि सामाजिक बांधिलकी असलेले नेतृत्व' – माजी शिक्षणमंत्री वसंतराव पुरके

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवार प्रा. डॉ. प्रशांत विघे यांच्या यवतमाळ जिल्हा प्रचार कार्यालयाचे उद्घाटन रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. माजी शिक्षणमंत्री वसंतराव पुरके यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. सुभाष गवई होते. जिल्ह्यातील शेकडो शिक्षक मतदार, शिक्षणतज्ज्ञ, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि समर्थक यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

उद्घाटनानंतर मार्गदर्शन करताना माजी शिक्षणमंत्री वसंतराव पुरके यांनी लोकशाही व्यवस्थेत नेतृत्व हे अभ्यास, दूरदृष्टी, निर्णयक्षमता, प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी यांवर उभे असते, असे सांगितले. प्रचाराचे नियोजन तर्कशुद्ध आणि व्यवहार्य विचारांवर आधारित असले पाहिजे, असे प्रतिपादन करत त्यांनी राजकीय विचारवंत हेरॉल्ड लास्की यांच्या उत्तरदायी नेतृत्वाच्या संकल्पनेचा उल्लेख केला.

"समाजातील सर्व घटकांचा विचार करणारा, लोकांच्या प्रश्नांशी बांधिलकी जपणारा आणि परिवर्तनाची स्पष्ट दृष्टी असलेला नेता लोकशाही अधिक सक्षम करतो. डॉ. प्रशांत विघे यांच्या व्यक्तिमत्त्वात ही सर्व वैशिष्ट्ये प्रकर्षाने दिसून येतात. ते केवळ निवडणूक लढवणारे उमेदवार नसून अभ्यासू, दूरदृष्टी असलेले आणि समाजहितासाठी झटणारे नेतृत्व आहे. अशा नेतृत्वाला शिक्षक मतदारांनी संधी द्यावी," असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी डॉ. प्रशांत विघे यांनी आपल्या उमेदवारीमागील भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, "माझी निवडणूक ही कोणत्याही वैयक्तिक महत्त्वाकांक्षेसाठी नसून व्यवस्था परिवर्तनासाठी आहे. शिक्षक, शिक्षण संस्था आणि उच्च शिक्षण क्षेत्रासमोरील प्रश्नांना न्याय मिळावा, प्रशासनात पारदर्शकता यावी आणि भावी पिढीला सक्षम शिक्षण व्यवस्था मिळावी, या उद्देशाने मी निवडणूक लढवत आहे."

पुढे ते म्हणाले की, शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न, रिक्त पदांची भरती, जुनी पेन्शन, शिक्षणातील गुणवत्तावाढ, संशोधनाला चालना आणि उच्च शिक्षणातील धोरणात्मक सुधारणा यासाठी सातत्याने लढा देण्याचा आपला निर्धार आहे.

अध्यक्षीय भाषणात डॉ. सुभाष गवई म्हणाले, "डॉ. प्रशांत विघे हे जुमले देऊन मत मागणारे उमेदवार नाहीत; तर काम करून मत मागणारे











उमेदवार आहेत. अभ्यासू वृत्ती, सातत्यपूर्ण संघर्ष, सामाजिक जाणीव आणि अन्यायाविरोधातील निर्भीड भूमिका यामुळे त्यांनी शिक्षक व समाजामध्ये विश्वासार्ह नेतृत्व निर्माण केले आहे. पर्याय मांडणारे आणि कृतीतून नेतृत्व सिद्ध करणाऱ्या अशा व्यक्तिमत्त्वाला विधान परिषदेत प्रतिनिधित्व मिळणे ही काळाची गरज आहे."

प्रास्ताविकात डॉ. पृथ्वीराज राजपूत यांनी डॉ. प्रशांत विघे यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सार्वजनिक कार्याचा परिचय करून दिला. त्यांनी आतापर्यंत ४५ पुस्तकांचे लेखन केले असून विविध विषयांवर सातत्याने अभ्यासपूर्ण लेखन केले आहे.

विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणून शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षण संस्थांच्या प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला असून भ्रष्टाचाराविरोधातील भूमिका, संशोधन क्षेत्रातील योगदान आणि सामाजिक बांधिलकीची विविध कार्ये त्यांनी अधोरेखित केली.

कार्यक्रमास यवतमाळ जिल्ह्यातील शेकडो शिक्षक मतदार, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून डॉ. प्रशांत विघे यांच्या यवतमाळ जिल्ह्यातील प्रचार अभियानाचा औपचारिक शुभारंभ झाला असून आगामी काळात जिल्हाभर व्यापक जनसंपर्क अभियान राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. राजश्री देशपांडे यांनी केले, तर प्राचार्य डॉ. राखी देशमुख यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, व्यवस्थापन, संस्थाचालक तसेच सर्व कार्यकर्त्यांनी विशेष पुढाकार घेत अथक परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनबद्ध कार्यामुळे संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध, उत्साहपूर्ण आणि यशस्वी वातावरणात पार पडला.

# जासई विद्यालयात स्वर्गीय मा. अजितदादा पवार साहेब यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख /एम.डी. भोईर :** श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील जूनियर कॉलेज, दहागाव विभाग, जासई येथे बुधवार, दिनांक २२ जुलै २०२६ रोजी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व महाराष्ट्राचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री स्वर्गीय मा.अजित दादा पवार साहेब यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक माननीय श्री कुटे सर



यांच्या शुभहस्ते, अजित दादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. या कार्यक्रमास पंचायत समितीचे साधन व्यक्ती श्री महाजन सर तसेच श्री ठोंबरे सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ. मुकादम मॅडम, कार्यक्रमाच्या प्रमुख इयत्ता

आठवी ड च्या वर्ग शिक्षिका,सौ. जितेकर मॅडम तसेच उपस्थित शिक्षक वर्गांनीही प्रतिमा पूजन करून, श्री महाजन सर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री. गाताडी सर यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रमुख, सौ जितेकर मॅडम, तसेच त्यांच्या वर्गातील विद्यार्थिनींनी अजित दादांबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास विद्यालयातील गुरुकुल प्रमुख भोईर सर,ज्येष्ठ शिक्षक श्री ठाकरे सर , श्री पावणेकर सर ,लॅब असिस्टंट श्री नवनीत पाटील सर , श्री कांबळे काका उपस्थित होते. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका तसेच कार्यक्रमाच्या प्रमुख, सौ. जितेकर मॅडम, यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# स्वर्गीय अजित पवार यांच्या जयंती निमित्त पनवेल महानगरपालिका मुख्यालयात अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्या जयंती निमित्त आज पनवेल महानगरपालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, तसेच महानगरपालिकेचे सन्माननीय सदस्य, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी, लेखाधिकारी संग्राम व्होरकटे, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या राजकारणातील अष्टपैलू नेतृत्व स्वर्गीय अजितदादा पवार यांनी संपूर्ण राजकीय आणि सामाजिक जीवनात कायमच सर्वसामान्य जनतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी, विशेषतः कृषी, सहकार, पायाभूत सुविधा आणि ग्रामीण भागातील सिंचन प्रकल्पांना गती देण्यासाठी त्यांनी घेतलेले निर्णय मैलाचा दगड ठरले. त्यांच्या कार्यातून समाजसेवा, विकास आणि लोककल्याणाची प्रेरणा पुढील पिढ्यांना मिळत राहील, अशा भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केल्या.

# सेंट मेरीज् जे.एन.पी. स्कूलमध्ये १० वीच्या गुणवंतांचा सत्कार व संवाद मेळा उत्साहात संपन्न!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी :** सेंट मेरीज् जे.एन.पी. स्कूल (जे.एन.पी.ए.) मध्ये इयत्ता १०वीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आणि संवाद मेळावा २२ जुलै रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे मुख्याध्यापक राजेश अल्फोंस सर यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून केली. त्यांनी यंदाच्या वर्षी शाळेने मिळवलेल्या ऐतिहासिक यशाचा आलेख मांडला. सेंट मेरीज् जे.एन. पी. स्कूलचा निकाल केवळ यावर्षीच नाही, तर दरवर्षी संपूर्ण उरण तालुक्यात अव्वल असतो. शाळेने आपली ही देदिप्यमान यशाची परंपरा यंदाही कायम राखली आहे.मुख्याध्यापक अल्फोंस सरांनी आपल्या भाषणात विशेष गौरवाने नमूद केले की, "माझ्या शाळेतील मुले केवळ शिक्षणातच नाही, तर संस्कारांच्या बाबतीतही उत्तम आहेत. शिक्षकांशी व इतरांशी असणारे त्यांचे आदरायुक्त वर्तन व बोलणे त्यांच्यातील सुसंस्कारीतपणाची साक्ष देते.

तसेच तसेच पालकांच्या वाढत्या मागणीचा विचार करून शाळेने एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे पुढील शैक्षणिक वर्षासाठी अकरावी वर्गाचे नियोजन करण्यात येत असून पालकांच्या आग्रहस्तव पुढील वर्षांपासून अकरावीचे वर्ग नक्की सुरू होतील असे संकेत मिळत आहेत



शाळेतील प्रथम ५ विद्यार्थ्यांनी उरण तालुका आणि रायगड जिल्ह्यात अव्वल स्थान मिळवून शाळेचा नावलौकिक वाढवला आहे, यामध्ये

कुमारी साची संतोष कासकर (९९.६%): उरण तालुका, रायगड जिल्हा आणि संपूर्ण नवी मुंबई विभागात प्रथम येण्याचा बहुमान तीने पटकावला आहे. तनिष्का नितिन ठाकूर (९८.२%): संपूर्ण रायगड जिल्ह्यात द्वितीय येण्याचा मान मिळवला.मोक्ष विजय म्हात्रे (९७.६%): उत्कृष्ट गुणांसह तालुक्यात अव्वल स्थान मिळवले.

सृष्टी दत्ता सुळे (९७.४%): घवघवीत गुणांसह यश संपादन केले आहे. आर्या आतिश पाटील हिने 96.4% गुण मिळवून चमकदार कामगिरी करत गुणवंतांच्या यादीत स्थान पटकावले.

सत्कारमूर्ती प्रथम पाच विद्यार्थ्यांनी सध्या दहावीत असलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा वेळेचे नियोजन आणि घेतलेले परिश्रम यावर मार्गदर्शन केले. तसेच मुख्याध्यापक शिक्षक आणि पालकांनी केलेल्या मार्गदर्शनाचा हा परिपाक असल्याचे त्यांनी अगदी कृतज्ञतेने सांगितले.

मुख्याध्यापक श्री राजेश अल्फोंस सरांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या पालक शिक्षक संघाचे रुपेश पाटील सर यांनी आपल्या मनोगत आहेत मुलांचे कौतुक केले इयत्ता दहावीच्या वर्ग शिक्षिका रेश्मा मगदूम ,लिजी अलेक्झांडर, आणि आरती मॅडम यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी मोलाचे संदेश दिले. शाळेचे पर्यवेक्षक संदेश गावंड सर यांनी आपल्या अभ्यासपूर्ण मनोगतातून विद्यार्थ्यांचे मनोधैर्य वाढवत शुभेच्छा दिल्या.

संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन मंगला शेट्टी मॅडम यांनी केले हा सोहळा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक राजेश अल्फोंस सर, पर्यवेक्षक संदेश गावंड सर, मंगल शेट्टी मॅडम, रेश्मा मॅडम, आरती मॅडम ,लिजी मॅडम ,हरिश सर ,सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक शिक्षक कमिटीचे सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# जासई विद्यालयात विद्यार्थी जनजागृती कार्यक्रम उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**उरण प्रतिनिधी / सागर घरत** : श्री छत्रपति शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा .पाटील जुनियर कॉलेज दहागाव विभाग, जासई येथे मंगळवार, दिनांक २१ जुलै २०२६ रोजी जासई पोलीस स्टेशनमार्फत विद्यार्थी जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. जासई पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्री निलेश जाधव सर यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन



केले. विद्यार्थी जनजागृती करण्यासाठी, साइबर क्राइम ,अमली पदार्थ विरोधी जागृती,विद्यार्थी. हेल्पलाइन, ई- बॉक्स ,स्त्रियांविषयी सन्मान ,बालविवाह नशेपासून कसे सावधान रहावे अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांना समुपदेशन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका माननीय सौ. मुकादम मॅडम, ज्येष्ठ शिक्षक श्री. ठाकरे सर, ज्येष्ठ शिक्षिका सौ. जितेकर मॅडम , तसेच विद्यार्थी उपस्थित होते .

# प्रेरणादायी मार्गदर्शक कॉ. यादवराव गायकवाड यांना स्मृतिदिना निमित्त क्रांतिकारी अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहुर प्रतिनिधी:सय्यद ईसा** : मार्क्सवादी व आंबेडकरवादी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते तथा शेवटच्या श्वासापर्यंत कम्युनिस्ट चळवळीत एकनिष्ठ असलेले दिवंगत यादवराव गोविंदराव गायकवाड यांचा स्मृतिदिन २२ जुलै रोजी माकप कार्यालयात साजरा करण्यात आला.

मुळचे विदर्भातील रहिवासी तथा माहूर तालुक्यातील वझरा शेख फरीद येथे स्थायिक असलेले आणि नंतर नांदेड येथे स्थायिक झालेले कॉ.यादवराव गायकवाड यांच्या प्रेरणेने अनेक कार्यकर्ते घडले व आज पुढारी म्हणून वेगवेगळ्या संघटनांचे पदाधिकारी आहेत.

शेतकरी कुटुंबातील यादवराव गायकवाड यांनी अनेक आंदोलनात प्रत्यक्षात सहभाग घेतला असून ते



डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांच्या विचारावर चालणाऱ्या संघटनाचे अभ्यासक आणि कार्यकर्ते होते.त्यांचा मुलगा कॉ.गंगाधर गायकवाड यांस माहूर शेतकरी आंदोलनात हद्दपार केल्यामुळे ते सन २००५ मध्ये नांदेड येथे स्थायिक झाले आणि नांदेड येथे देखील त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी जनहितार्थ अनेक लक्षवेधी आणि यशस्वी आंदोलने केली.त्यांच्या मुलावर अनेक आंदोलनात वेगवेगळे गंभीर गुन्हे दाखल झाले असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल वाईट प्रतिक्रिया देणाऱ्या शालिनी पाटील निषेध आंदोलनात गंभीर गुन्हे नांदेड मध्ये दाखल असून त्यांच्यावर सन २००६ पासून जिल्हा न्यायालयात खटला अजूनही सुरु आहे.

त्यांच्या कुटुंबातील मुलगा, सून, नातू, मुली, पुतणे, पुतण्या असे अनेक जन आज मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात व पक्षाच्या विविध जन संघटना मध्ये सक्रिय कार्यकर्ते व पुढारी आहेत.

त्यांना स्मृतिदिना निमित्ताने माकप कार्यालयात अभिवादन करण्यात आले व आदरांजली वाहण्यात आली. यावेळी कॉ.जयराज गायकवाड,कॉ.लता गायकवाड,कॉ. सुंदरबाई वाहूळकर,कॉ. प्रयागबाई लोखंडे, कॉ. मंगेश वट्टेवाड, कॉ. इंदिराबाई टेंबरे, कॉ. चंद्रकांत लोखंडे, कॉ.साहेबराव गजभारे,कॉ.दिगंबर टेंबरे,कॉ. विश्वजीत गजभारे आदींची उपस्थिती होते.

# अपंगांसाठीच्या दुकानांचा गैरवापर ; गुटखा साठा जप्त करत फौजदारी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** अपंगांच्या सहाय्यासाठी दुकानांचे परवाने दिले जातात. मात्र त्याचा गैरवापर होत असल्याचे उघड झाले आहे. खारघर येथील खुटूकबांधण गावाच्या प्रवेशद्वाराजवळील एका अपंग व्यक्तीच्या नावे असलेल्या दुकानावर रविवारी खारघर पोलिसांनी छापा टाकत गुटख्याचा साठा जप्त केला. पोलिसांनी केलेल्या कारवाईदरम्यान 20 वर्षीय माताप्रसाद निशाद हा व्यक्ती हे दुकान चालवत असल्याचे आढळले. तपासादरम्यान विक्रीसाठी ठेवलेला 9 हजार 830 रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला. या प्रकरणी माताप्रसाद निशाद याच्याविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दुकानावर 'पनवेल महापालिका हद्दीतील अपंग व्यक्ती पोलिओ आदिल ए. रौफ' असा फलक लावण्यात आला होता. मात्र, प्रत्यक्षात संबंधित अपंग व्यक्ती हा व्यवसाय चालवत नसल्याचे पोलिसांच्या कारवाईत स्पष्ट झाले. त्यामुळे अपंगांच्या नावाने मिळालेली दुकाने इतरांना भाड्याने देण्याचा प्रकार उघड झाला.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी अमली पदार्थ आणि प्रतिबंधित गुटखा विक्रीविरोधात कठोर कारवाई करण्याच्या सूचना सर्व पोलीस ठाण्यांना दिल्यानंतर शहरात अशा कारवाया वाढल्या आहेत. खारघरमधील या कारवाईमुळे पनवेल महापालिकेच्या मदतीने सुरू असलेल्या दुकानांची वैधता, त्यांना परवाने देण्याची प्रक्रिया आणि संबंधित प्रभाग कार्यालयांकडून अशा दुकानांवर कारवाई का करण्यात आली नाही, असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

त्यामुळे अपंगांसाठीच्या योजनांचा गैरवापर रोखण्यासाठी महापालिकेने स्वतंत्र पडताळणी मोहीम राबवून यासाठी प्रत्येक वार्डात बीट मार्शल नेमण्याची मागणी पुढे येत आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पजवा सेवा निवृत्त कर्मचारी,दि म्युनिसिपल मजदूर युनियन आणि उप.प्रमुख अभियंता(पजवा) यांच्या बैठकीत सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांच्या मागण्या संदर्भात सकारात्मक चर्चा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (प्रतिनिधी -गुरुनाथ तिरपणकर) :** मुंबई महानगर पालिकेतून एखादा कर्मचारी निवृत्त झाला की त्यांची देय्य रक्कम, सेवा निवृत्त लाभ दिले जातात, आणि काही लाभ प्रशासनाकडून देणे टाळले जाते,त्यांच अनुषंगाने पर्जन्य जलनि:सारण खात्यातील सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात नुकताच दादर येथील पजवा कार्यशाळेतील आलीशान सभागृहात उप.प्रमुख अभियंता(पजवा), म्युनिसिपल मजदूर युनियनचे सरचिटणीस रमाकांत बने आणि पजवा सेवा निवृत्त कर्मचारी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती.त्याअगोदर सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात मुंबईच्या महापौर सन्माननीय सौ.रितु तावडे, म्युनिसिपल मजदूर युनियन यांजकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. महापौरांनी आपला अभिप्राय पजवा कार्यालयाकडे पाठविला, म्युनिसिपल मजदूर युनियनेही पत्रव्यवहार करुन पाठपुरावा केला.आयोजित केलेल्या बैठकीत१०/२०/३०नुसार कालबद्ध पदोन्नतीचा लाभ मिळावा यासंदर्भात सकारात्मक



चर्चा झाली काही कामगारांची कार्यवाही पुर्ण झाली आहे त्याचे लाभ त्यांना मिळतील उर्वरित कर्मचाऱ्यांची कार्यवाही चालु यथावकाश त्यांना त्यांचे लाभ मिळतील असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.सर्व सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचे सर्विस रेकॉर्ड एका महिन्यात देण्याचे पजवा प्रशासनाने कबूल केले आहे.प्रशासनाकडे कार्यालयीन कर्मचारी वर्ग कमी असल्याकारणाने थोडी दिरंगाई होत आहे.सेवा निवृत्त कर्मऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत दस्ताऐवज, कार्यालयीन काम करण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात कर्मचारी उपलब्ध करुन देण्यासाठी युनियन सरचिटणीस रमाकांत बने सर पुढाकार घेतला आहे. तसेच कर्मचारी उपलब्धतेसाठी उप.प्रमुख.(पजवा) यांनी वरिष्ठ पातळीवर पत्रव्यवहार करावा असेही बैठकीत ठरविण्यात आले. तसेच थकीत ओवर टाइम संदर्भात पडताळणीसह कार्यवाही चालू आहे.शेवटी सर्वात महत्त्वाचा मुद्दा लाड-पागे आयोगानुसार सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांच्या एका पाल्यांला मुंबई महापालिकेत सामावून घेण्यासंदर्भात.म्युन्सिपल मजदूर युनियनचे सरचिटणीस रमाकांत बने यांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे.कायदेशीररित्या लढा देऊन सर्व सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांनी संघटित होऊन हा लढा पुढे नेत यश प्राप्त करायचे आहे.तसेच जे कर्मचारी२०२३नंतर निवृत्त झाले आहेत, त्यांना तीन कालबद्ध पदोन्नती मिळणार आहेत, त्या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांनी स्वतः कार्यालयाकडे अर्ज सादर करावायाचे आहेत, असे सुचित करण्यात आले.एकंदरीत सर्व चर्चा खेळीमेळीच्या वातावरणात सकारात्मक झाली.या चर्चेत उप.प्रमुख अभियंता(प.ज.वा.),दि म्युनिसिपल मजदूर युनियनचे सरचिटणीस रमाकांत बने,प्रशासन कर्मचारी, सेवा निवृत्त कर्मचारी चंद्रकांत तेलंगे, शंकर नितनवरे, शिवाजी पवार, विजय जाधव, गौतम कांबळे आणि इतर सेवा निवृत्त कर्मचारी सहभागी झाले होते.

# सेंट मेरीज जे ऐन पी स्कूल जेएनपीटी दैदीप्यमान यश! सांची कासुकार रायगड जिल्ह्यात प्रथम

**दैनिक युवक आधार/**

**उरण प्रतिनिधी सायली साळुखे :** शैक्षणिक वर्ष 2025-26 च्या एसएससी परीक्षेत उरण तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात नावलौकिक मिळवणाऱ्या सेंट मेरीज जे ऐन पी स्कूल जेएनपीटी येथे आज "इयत्ता 10 वी सत्कार समारंभ आणि संवाद मेळा" मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागतपर भाषणाने झाली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या यशाची माहिती देताना सांगितले की, आपली विद्यार्थिनी कुमारी सांची संतोष कासुकार हिने 500 पैकी 498 गुण म्हणजेच 99.6% मिळवून उरण तालुक्यात प्रथम, रायगड जिल्ह्यात प्रथम आणि नवी मुंबई



विभागात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. सांचीच्या या ऐतिहासिक यशाने संपूर्ण शाळेचे नाव उंचावले आहे.

या यशात एकटी सांचीच नाही तर शाळेतील इतर चार विद्यार्थ्यांनीही उरण तालुक्यात आघाडी घेतली आहे. कुमारी तनिष्का नितीन ठाकूर हिने 491 गुणांसह 98.2% मिळवून उरण तालुक्यात दुसरा आणि रायगड जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळवला. मोक्ष विजय म्हात्रे 488 गुणांसह 97.6% मिळवून तालुक्यात तिसऱ्या, सृष्टी दत्ता सुळे 487 गुणांसह 97.4% मिळवून चौथ्या आणि आर्या अतिश पाटील 482 गुणांसह 96.4% मिळवून पाचव्या क्रमांकावर राहिली. अशा प्रकारे उरण तालुक्यातील पहिल्या पाच क्रमांकांवर सेंट मेरीजच्या विद्यार्थ्यांनीच वर्चस्व गाजवले.

कार्यक्रमात शाळेच्या पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री. रूपेश पाटील सर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रथम पाच क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी यश मिळवण्यासाठी केलेला अभ्यास, घेतलेले परिश्रम आणि शिक्षकांचे मार्गदर्शन याविषयी माहिती दिली. वर्गशिक्षिका सौ. मगदूम आणि सौ. लिजी यांनीही विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

इयत्ता 10 वी च्या वर्गशिक्षिका सौ. रेशमा सेंडर आणि सौ. आरती मॅडम यांनीही विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेचे पर्यवेक्षक श्री. संदेश गावंड सर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी भाषणातून शुभेच्छा दिल्या. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मंगला शेट्टी मॅडम यांनी केलेया यशस्वी कार्यक्रमासाठी पर्यवेक्षक श्री. संदेश गावंड सर, सौ. मंगला शेट्टी मॅडम, सौ. रेशमा मॅडम, सौ. आरती मॅडम, सौ. लिजी मॅडम, श्री. हरीश सर आणि सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक शिक्षक समितीच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशामुळे सेंट मेरीज शाळेचा नावलौकिक अधिकच वाढला असून संपूर्ण उरण परिसरात अभिमानाची भावना आहे

# श्री छत्रपती कला वाणिज्य महाविद्यालयात अजितदादा पवार यांची ६७ वी जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथील श्री छत्रपती कला वाणिज्य महाविद्यालयात उपमुख्यमंत्री तथा राज्याचे वित्तमंत्री मा.अजितदादा पवार यांच्या ६७ व्या जयंतीनिमित्त बुधवार,दि. २२ जुलै रोजी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या प्राचार्या शिवाली माने-देशमुख यांच्या हस्ते अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.यानंतर महाविद्यालयाच्या वतीने वृक्षारोपण,रक्तदान शिबिर तसेच लहान मुलांना खाऊ वाटप असे समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले.

यावेळी प्रा.हर्षदा वानखेडे यांनी मनोगत व्यक्त करताना अजितदादा पवार यांच्या सामाजिक, राजकीय आणि विकासाभिमुख कार्याचा आढावा घेतला.राज्याच्या सर्वांगीण




विकासासाठी त्यांनी केलेल्या विविध उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांनी समाजाप्रती उत्तरदायित्वाची भावना जपावी,असे आवाहन त्यांनी केले.या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले.शेवटी प्रा. प्रणाली होरणे यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# झिरपूरवाडी येथे शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण व प्रतिमा पूजन उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस तालुका प्रतिनिधी उमेश साखरकर :** तालुक्यातील झिरपूरवाडी येथे सामाजिक बांधिलकी जपत राष्ट्रवादी काँग्रेस असंघटित कामगार विभागाचे यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष रूपेश राठोड यांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, वृक्षारोपण तसेच लोकनेते स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेचे पूजन असा संयुक्त कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबत प्रेरणा निर्माण झाली तर पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व अभिवादनाने करण्यात आली.

त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल आदी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी नियमित शिक्षण घेऊन उज्ज्वल भवितव्य घडवावे, असे आवाहन मान्यवरांनी केले. यानंतर परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपणाबरोबरच लावलेल्या प्रत्येक



रोपाचे संगोपन करण्याची जबाबदारीही स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले. वाढते प्रदूषण आणि बदलते हवामान लक्षात घेता प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संवर्धन करावे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच दादाराव राठोड यांची तर प्रमुख अतिथी म्हणून प्रशासक तथा माजी सरपंच पुरुषोत्तम कुडवे यांची उपस्थिती होती. यावेळी सुखदेव शेळके, शंकर जुडे, नागोराव भोडणे, निखिल डहाणे, सुभाष पवार, संदिप मिरासे, हिरासिंग राठोड, प्रकाश भुजाडे, पत्रकार धर्मराज गायकवाड, अंबादास भस्मे, पांडुरंग शेळके, संदिप ढोके, विनोद राठोड, बंडू अंबुरे, प्रदीप जाधव, विष्णू टोगळे, गजानन बोरचाटे, बबन कुडवे, अमोल बोरचाटे, रामकृष्ण कुडवे, बाबाराव डहाणे, नंदकिशोर रणमले, सुरज पवार, एकनाथ मिरासे, गजानन ढोरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव गजानन टाके तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक भिमराव बोरचाटे यांनी मानले.

> झिरपूरवाडी गावात आदिवासी विकास विभागाकडून १ कोटीचे सभागृह व संकुल, तसेच मदत व पुनर्वसन विभागामार्फत ८४ लाख रुपयांची संरक्षण भिंत व नालीचे काम प्रस्तावित आहे. शिवाय बिरसा मुंडा चौकात सौंदर्यीकरण्यासाठी १० लक्ष रुपयांचे कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. वाढीव पाणीपुरवठा विहिर व पाण्याच्या टाकीचे कामही होणार आहे. गावठाण जागेसाठी प्रकरण प्रस्तावित आहे. अजितदादांनी माझ्या सारख्या छोट्या कार्यकर्त्यांना जनतेची कामे करण्याची संधी दिली, हिच दादाला खरी आदरांजली ठरेल.
> -रूपेश दादाराव राठोड
> जिल्हा उपाध्यक्ष- राष्ट्रवादी काँग्रेस असंघटीत कामगार विभाग, यवतमाळ

# येवदा येथे भव्य महाआरोग्य शिबिर व वृक्षारोपण अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे |तालुका प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त येवदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात भव्य महाआरोग्य शिबिर आणि वृक्षारोपण अभियान उत्साहात पार पडले. या उपक्रमाला परिसरातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला.

महाआरोग्य शिबिरात शेकडो नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. विविध आजारांवरील उपचारांसाठी तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले तसेच गरजू रुग्णांना मोफत औषधांचे वितरण करण्यात आले. महिलांसह ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांनीही या शिबिराचा लाभ घेतला.याचवेळी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी वृक्षसंवर्धनाची शपथ घेत परिसर हिरवागार ठेवण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार रमेश बुंदिले होते. यावेळी विविध राजकीय, सामाजिक, आरोग्य व







शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक कार्यकर्ते, आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

तालुका आरोग्य विभाग, प्राथमिक आरोग्य केंद्र येवदा आणि जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या वैद्यकीय पथकाने शिबिरात सक्रिय सहभाग नोंदवून नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# आळंद येथे जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांनी काढली पंढरीची वारी

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद टेंभुर्णी प्रतिनिधी अनिल ससाने :** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यातील आळंद येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांनी उत्साहात पंढरीची वारी काढली. वारकरी वेशभूषा परिधान केलेल्या विद्यार्थ्यांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात, विठ्ठल-रखुमाईच्या जयघोषात आणि अभंग-भजनांच्या सुरावटीत गावातून दिंडी काढून भक्तिमय वातावरण निर्माण केले.



या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वारकरी परंपरा, संत साहित्य आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची ओळख करून देण्यात आली. शिक्षकांनी वारीचे महत्त्व आणि संतांच्या विचारांचे मार्गदर्शन केले. ग्रामस्थांनीही विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करत दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत केले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक मधुकर गोफणे सर, सहशिक्षिका सुषमा काकडे तसेच पालकांनी विशेष परिश्रम घेतले.

# कल्पवृक्ष महिला ग्रामसंघातील १३ बचत गटांना उमेदच्या समुदाय गुंतवणूक निधीतून ₹ ७.८० लाखांचे वितरण

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय :** महाराष्ट्र शासनाच्या उमेद –महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत कार्यरत असलेल्या कल्पवृक्ष महिला ग्रामसंघ,भवानीनगर यांच्या मासिक आढावा बैठकीत महिला सक्षमीकरणाला चालना देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला.स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात १३ महिला स्वयंसहाय्यता बचत गटांना समुदाय गुंतवणूक विकास निधीतून प्रत्येकी ₹ ६० हजार,असे एकूण ₹ ७ लाख ८० हजारांचे वाटप करण्यात आले.भवानीमाता मंदिर परिसरात झालेल्या या कार्यक्रमात सणसर ग्रामपंचायतीचे सरपंच यशवंत नरुटे यांच्या



हस्ते निधीचे धनादेश लाभार्थी बचत गटांना प्रदान करण्यात आले.या निधीच्या माध्यमातून महिलांना विविध लघुउद्योग,स्वयंरोजगार व उत्पन्नवाढीच्या उपक्रमांना चालना मिळणार असून ग्रामीण भागातील महिला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.यावेळी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना सरपंच यशवंत नरुटे यांनी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून उमेद अभियानातील महिलांना आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, असे सांगितले. कल्पवृक्ष महिला ग्रामसंघासाठी स्वतंत्र कार्यालय उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील,तसेच महिलांच्या ज्ञानवृद्धीसाठी अभ्यास दौऱ्यांचे आयोजन करण्यासही ग्रामपंचायत सहकार्य करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. याशिवाय अस्मिता महिला प्रभाग संघाला स्वच्छ भारत मिशन योजनेअंतर्गत शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.बैठकीस ग्रामसंघाच्या अध्यक्षा कविता वाळके,कोषाध्यक्षा राजश्री निंबाळकर,लिपिका वैशाली पांढरे,ग्रामसंघाच्या ग्रामसखी प्रेरिका तथा उद्योगसखी कामिनी चव्हाण, प्रभाग समन्वयक डी.जे.राऊत,प्रभाग संघ व्यवस्थापक कविता केकाण,ग्रामसखी प्रेरिका रेश्मा चव्हाण,आर्थिक साक्षरता सखी स्वाती लांडगे, ग्रामसखी बँक लिंकेज सखी फातिमा शेख,राणी सांगळे यांच्यासह परिसरातील अनेक महिला बचत गटांच्या सदस्यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे नियोजन आणि समन्वय कल्पवृक्ष महिला ग्रामसंघाच्या पदाधिकाऱ्यांनी केले.शेवटी कामिनी चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# कुरळा ग्रामपंचायतीत कथित भ्रष्टाचाराने खळबळ; उपसरपंचपद जाणार का? राजेश घुगे यांचा गंभीर आरोप

## मनरेगा, घरकुल, बोगस कामे, खोट्या सह्या; नवीन बीडीओंकडे पुन्हा निवेदन, सखोल चौकशी व तातडीच्या कारवाईची मागणी !

'या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, उपसरपंचांचे पद रद्द करावे आणि संबंधित अधिकाऱ्यांवरही कठोर कारवाई करावी. अन्यथा पुढील ७ ते १० दिवसांत उच्च न्यायालयात धाव घेऊन वाशिम जिल्हा परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल.'

— राजेश निवासराव घुगे

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : कुरळा (मालेगाव)तालुक्यातील कुरळा ग्रामपंचायतीतील विविध शासकीय योजनांमध्ये कथित आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप तक्रारदार राजेश निवासराव घुगे यांनी केला असून, त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO), जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांच्याकडे पुराव्यासह लेखी तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीमुळे तालुक्यासह जिल्ह्यातही मोठी खळबळ उडाली आहे.

तक्रारीनुसार, उपसरपंच बेबीताई अभिमान इंगळे व ग्रामरोजगार सेवक अभिमान राघोजी इंगळे (पती-पत्नी) यांनी संगनमताने मनरेगा, घरकुल, स्वच्छ भारत मिशन आदी योजनांतील शासकीय निधीचा गैरवापर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. सरपंचांच्या खोट्या सह्या करणे, प्रोसिडिंग बुकमध्ये खाडाखोड करणे, डीएससी (DSC) चा गैरवापर करणे, प्रत्यक्ष वृक्षलागवड न करता बोगस नोंदी करणे, उपसरपंचांच्या शेतात बोगस फळबाग दाखविणे, नातेवाईकांच्या नावाने मटेरियल बिले व बोगस हजेरी लावून निधी वळविल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

तसेच, मनरेगाचे पैसे लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करून ते दबाव टाकून परत घेतल्याचा, घरकुल योजनेत कमिशन घेतल्याचा, अपात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजूर केल्याचा आणि खोटे फोटो अपलोड करून निधी उचलल्याचाही आरोप करण्यात आला आहे. गावात सेग्रिगेशन शेड, घंटागाडी आणि सोलर पंप प्रत्यक्षात नसतानाही कागदोपत्री अस्तित्व दाखवून निधी काढल्याचा दावाही करण्यात आला आहे.




तक्रारदारांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ च्या कलम १४ (१)(ग) अंतर्गत उपसरपंचांचे पद रद्द करण्याची मागणी केली आहे. तसेच ग्रामसेवक विजय दहात्रे यांच्याविरोधात शिस्तभंगाची कारवाई निश्चित झाल्यानंतरही अहवाल मागील ५० दिवसांपासून वरिष्ठांकडे पाठवण्यात विलंब होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित अधिकाऱ्यांवरही महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अंतर्गत कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, हे प्रकरण यापूर्वी तत्कालीन गटविकास अधिकाऱ्यांकडे प्रलंबित होते. त्यांच्या बदलीनंतर मितेश पाटील यांनी मालेगाव पंचायत समितीचे नवीन गटविकास अधिकारी (बीडीओ) म्हणून पदभार स्वीकारला आहे. त्यानंतर तक्रारदार राजेश घुगे यांनी नवीन बीडीओंची प्रत्यक्ष भेट घेऊन संपूर्ण प्रकरणाची सविस्तर माहिती देत पुन्हा एकदा निवेदन सादर केले. या निवेदनात यापूर्वी घडलेल्या सर्व कथित गैरव्यवहारांचा तपशील नमूद करून प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून जे दोषी असतील त्यांच्यावर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून हे प्रकरण प्रलंबित असल्याने आता अभ्यासू व कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळख असलेले नवीन बीडीओ मितेश पाटील हे हे प्रकरण किती वेगाने आणि निष्पक्षपणे हाताळतात, दोषींवर कारवाईचे आदेश देऊन कथित भ्रष्टाचार उघडकीस आणणाऱ्या तक्रारदाराला न्याय मिळवून देतात का, याकडे संपूर्ण मालेगाव तालुक्याचे लक्ष लागले आहे. या प्रकरणातील पुढील प्रशासकीय कारवाईबाबत तालुक्यात सध्या जोरदार चर्चा सुरू आहे.

या संपूर्ण प्रकरणातील आरोपांची सत्यता शासकीय चौकशीनंतर स्पष्ट होणार असली, तरी या तक्रारीमुळे ग्रामपंचायत व प्रशासनात मोठी खळबळ उडाली असून, आता सर्वांचे लक्ष नवीन बीडीओंच्या निर्णयाकडे आणि पुढील कारवाईकडे लागले आहे.

# कै.अजितदादा पवार यांची जयंती उत्साहात

## शासकीय कार्यालयांना फोटो भेट देण्याच्या उपक्रमाचे कौतुक

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव शहरातील भारत पेट्रोलियम पंप येथे आज महाराष्ट्रचे मा.उपमुख्यमंत्री आदरणीय अजित दादा पवार यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी आमखेडा येथील मा.सरंपच चिधुकाका आगे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन केले.यावेळी तालुका अध्यक्ष सुनिल साखळे,भारत पेट्रोलियम पंपाचे मालक ॲड योगेश पाटील,विजय काळे,अतुल चौधरी, उपस्थित होते तसेच तालुक्यातील पळासखेडा येथील ग्रामपंचायत कार्यालय तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कै. अजितदादा पवार यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी कै. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ॲड योगेश पाटील व तालुका अध्यक्ष सुनील साखळे पाटील यांनी कै.अजितदादा पवार यांच्या कार्याबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले. कै.अजितदादा पवार यांनी आपल्या राजकीय व सामाजिक



जीवनात सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत विकासकामांना गती देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.ग्रामीण भागाचा विकास,शेतकरी,युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी त्यांनी केलेले कार्य सदैव स्मरणात राहील,असे सुनील साखळे पाटील यांनी सांगितले.

दरम्यान,तालुका अध्यक्ष सुनील साखळे पाटील यांच्या पुढाकारातून कै.अजितदादा पवार यांचे छायाचित्र असलेले फोटो सोयगाव शहरातील तालुक्यातील विविध शासकीय कार्यालयांना भेट देण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे.या उपक्रमातून कै.अजितदादा पवार यांच्या कार्याच्या स्मृती जपण्याचा आणि त्यांच्या विचारांची प्रेरणा जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात असल्याने या उपक्रमाचे तालुक्यात कौतुक होत आहे.कार्यक्रमास भूषण पांढरे, सुरेश पांढरे,कैलास शेलेकर, दिलीप पांढरे,पांडुरंग थोरात,आदित्य वाघ,ऋषिकेश थोरात,रवी बोराडे,ज्ञानेश्वरथोरात,देवचंद शिनगारे,प्रकाश सावळे,गजानन साखळे,पंकज सावळे,प्रणव थोरात,साहेबराव पांढरे,कचरूलाल जैन,शंपू थोरात,सुभाष राहुल सोनाळकर,शुभम जमादार,समाधान माळी,मंगल राजपूत,समाधान साखळे,राहुल पांढरे व पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, मांगली चौ. तर्फे गरजू दिव्यांगाला माणुसकीचा हात

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा** -महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पवनी तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, मांगली चौ. यांच्या वतीने एका गरजू दिव्यांग बांधवाला नवीन कपड्यांचे वाटप करून माणुसकीचा आदर्श समाजासमोर ठेवण्यात आला. जयंतीचा उत्सव केवळ शुभेच्छांपुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू व्यक्तीच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्याच्या उद्देशाने हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला.

आजच्या धावपळीच्या जीवनात अनेक गरजू, दिव्यांग आणि निराधार व्यक्तींना मदतीची गरज असते. अशा व्यक्तींच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे, हीच खरी समाजसेवा आहे, या भावनेतून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, मांगली चौ. येथील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एका गरजू दिव्यांग बांधवाला नवीन कपड्यांचे वाटप केले. कपडे स्वीकारल्यानंतर त्या दिव्यांग बांधवाच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान आणि आनंद पाहून उपस्थित नागरिकही



भारावून गेले.

यावेळी कार्यकर्त्यांनी सांगितले की, "समाजासाठी काम करणं, गरजूंना मदतीचा हात देणं आणि संकटात असलेल्या व्यक्तींच्या पाठीशी उभं राहणं, हीच अजितदादा पवार यांच्या कार्यशैलीतून मिळालेली प्रेरणा आहे. खऱ्या अर्थाने जयंती साजरी करायची असेल तर ती समाजोपयोगी कार्यातूनच व्हायला हवी."

या उपक्रमामुळे परिसरात माणुसकी, सामाजिक बांधिलकी आणि सेवाभावाचा संदेश पोहोचला. उपस्थित ग्रामस्थांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत, अशा सामाजिक उपक्रमांमुळे समाजात एकोप्याची भावना अधिक दृढ होत असल्याचे मत व्यक्त केले. गरजूंच्या मदतीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, मांगली चौ. यांचे असे उपक्रम भविष्यातही सातत्याने सुरू राहावेत, अशी अपेक्षाही नागरिकांनी व्यक्त केली.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य चेतन पडोळे, जीवन वैद्य (माजी उपसरपंच), घनश्याम पडोळे, गणेश मानापुरे, चंद्रशेखर पडोळे, खुशाल वरंभे, सोनू पडोळे, सोमा सेनमारे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, मांगली चौ. येथील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दर्जेदार सेवा व सुरक्षेसाठी आज वीजपुरवठा बंद

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : वीज ग्राहकांना अखंडित आणि सुरक्षित वीजपुरवठा मिळावा, या उद्देशाने महावितरण नेहमीच कटीबद्ध असते. याच उपक्रमाचा भाग म्हणून, बुधवार, दिनांक 22 जुलै 2026 रोजी एबीस्विच बसवणे, री-जंपरिंग', झाडांच्या फांद्या छाटण्याचे काम, जुनी यंत्रणा काढणे, रस्ता रुंदीकरणासाठी वाहिनी स्थलांतर. रिंग मेन युनिट चार्जिंग आणि नियोजित देखभाल आणि दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामांमुळे महाल विभागातील काही भागात तर कॉंग्रेसनगर विभागात नियमित देखबाल व दुरुस्तीच्या कामांमुळे सकाळच्या सत्रात वीजपुरवठा बंद राहील

या कामांमुळे महाल विभागात सकाळी 9 ते 12 या वेळेत नंदनवन मेन रोड, मंगलमूर्ती चौक, कीर्ती स्वीट रोड, नंदनवन, वुमेन्स कॉलेज, भांडे प्लॉट चौक, कबीर नगर, मिरे लेआउट, बापू नगर, शितल माता मंदिर या भागात, सकाळी 8 ते 12 या वेळेत तपस्या कॉन्व्हेंट. आकाश नगर, अवधूत नगर, विज्ञान नगर, शेष नगर, महाकाली नगर या भागात, सकाळी 7 ते 11 या वेळेत विणकर वसाहत, आर्य कार शोरूम, साउथ पॉइंट स्कूल, इन्फिनिटी क्लिनिक, कल्याणेश्वर नगर, गीता नगर, वनराई नगर, परिवर्तन चौक, दिवाण लेआउट या भागात, सकाळी 8:30 ते 10:30 या वेळेत गुजरवाडी, चांडक लेआउट, कॉटन मार्केट चौक या भागात तर, सकाळी 8 ते 11 या वेळेत दर्शन कॉलनी, गंगाबाई घाट, गंगा विहार, व्यंकटेश नगर या भागातील वीजपुरवठा बंद राहील.

नियोजित देखभाल आणि दुरुस्तीच्या कामांमुळे कॉंग्रेसनगर विभागात सकाळी 8 ते 10 या वेळेत ऑरेंज सिटी. कालीमाता या भागात, सकाळी 7:30 ते 11 या वेळेत शिवाजी पार्क भागात, सकाळि 8 ते 11 या वेळेत एकात्मता नगर, डोंगरे लेआउट, अभिजीत सोसायटी, पूजा लेआउट,दादाजी नगर, वानखेडे लेआउट, राही कॉलनी, ऑर्बिटल एम्पायर, जेतवन सोसायटी, दिनदयाल नगर, मिलानियम जिम, लोकसेवा नगर, सुजाता लेआउट, अग्ने बिल्डिंग, गांधी बिल्डर, प्रियदर्शनी नगर, बाहुबल लेआउट, गुडधे लेआउट, एकलव्य लेआउट, पागे अपार्टमेंट, एनआयटी लेआउट, त्रिमूर्ती नगर, भामटी, गेडाम लेआउट, एचआयजी-82 या भागातील तर सकाळी 7 ते 11 या वेळेत राय इम्पीरियल, ऑर्किड, पायनियर, ग्रीन लॉन, शाहु नगर, नारायण विद्यालय, रचना अपार्टमेंट, एचपी पेट्रोल पंप, राजाराम नगर, चिखली आणि खापरी नाका या भागातील वीज पुरवठा बंद राहील. याशिवाय बुटीबोरी विभागात 10 ते दुपारी 2 या वेळेत ए झोन फेज 2 मधील औद्योगिक ग्राहकांचा वीज पुरवठा बंद राहील.

ही कामे पूर्ण झाल्यानंतर वीजपुरवठा त्वरित पूर्ववत करण्यात येईल. देखभाल आणि दुरुस्तीच्या या कामामुळे भविष्यात पावसाळ्यात होणारे बिघाड टाळण्यास आणि वीज पुरवठ्याची विश्वासार्हता वाढवण्यास मोठी मदत होणार आहे. महावितरण प्रशासनाने या कालावधीत ग्राहकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. तांत्रिक कामे सुरळीत पार पाडण्यासाठी आणि ग्राहकांच्या सुरक्षिततेसाठी हा वीजपुरवठा खंडित करणे आवश्यक आहे, याची ग्राहकांनी कृपया नोंद घेण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

**उपमुख्य जनसंपर्क अधिकारी,**
**महावितरण, नागपूर.**

# "पिलीव नगरी दिंड्या व पालखी सोहळयाच्या आगमनाने व ज्ञानोबा तुकाराम यांच्या जयघोषाने गजबजली"

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रघुनाथ देवकर** - संपूर्ण जगाचे दैवत श्री विठ्ठल रुक्मिणी माता यांच्या दर्शनासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून देवशयनि आषाढी एकादशीचे औचित्य साधून पंढरपूर नगरीकडे असंख्य साधुसंत, महंत व महाराज यांच्या दिंड्या व पालखी सोहळे "ज्ञानोबा तुकारामाच्या जयघोषामध्ये"आणि टाळ मृदुंगाच्या गजरात मार्गक्रमण करत असतात . त्याप्रमाणेच बत्तीस शिराळ्याहून श्री. गोरक्षनाथ महाराज पुसेगावहून सेवागिरी महाराज तर शेकोबा दादा महाराज, दादा महाराज सातारकर



कोटेश्वर शिरसवडी इंचगिरी, हरिहर गड सुळेवाडी (पिलीव) हरिहर बाबा महाराज, सद्गुरु रामगिरीबाबा महाराज (शिरढोण)अशा अनेक साधुसंत, महंत, व महाराजांच्या दिंडी व पालखी सोहळ्यांनी सांगली सातारा व इतर जिल्ह्यातून सोलापूर जिल्ह्यामध्ये प्रवेश करून ऐतिहासिक समजल्या जाणाऱ्या पिलीव नगरीमध्ये "राम कृष्ण हरी, ज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम"च्या निनादात खांद्यावरती भगवी पताका घेऊन प्रवेश करताच ग्रामस्थ व भाविक भक्तांच्या मनामध्ये भक्तीभाव निर्माण होऊन अतिशय आनंदामध्ये सर्व घटकातून फटाक्याच्या आतषबाजीत व तोंडातून हरिनामाच्या जयघोषाने जागोजागी घरोघरी अतिशय भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. दिंडी व पालखी सोहळ्यातील भाविकांच्या फुगडी नृत्याने त्याचप्रमाणे अभंगाने अंतकरणापासून आनंद व्यक्त केला जात होता व प्रत्येक नागरिक मोठ्या भक्ती भावाने दर्शनाचा लाभ घेत असल्याचे चित्र दिसून आले. व पिलीवला प्रति पंढरपूरचे स्वरूप आल्याचे दिसून आले. सर्व भाविक भक्तांना महाप्रसाद त्याचप्रमाणे आरोग्य विषयी सुविधा, तसेच रस्तो रस्ती स्वच्छता, दिव्यांचा लखलखाट यामुळे पिलीव नगरी गजबजलेली दिसून आली. प्रशासक अश्वजीत सरवदे, सदाशिव भंडलकर ग्रामपंचायत अधिकारी पिलीव, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, पोलीस विभाग वीज वितरण कंपनी महसूल विभाग तरुण मंडळे विविध संघटना व सर्व ग्रामस्थ यांनी या काळामध्ये सहकार्य केले.

# नूतन प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये स्व अजित दादा पवार यांची जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**

**जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील** : अडावद ता चोपडा येथील नूतन प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये शासन परिपत्रकानुसार दिनांक 22 जुलै 2026 रोजी महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन ज्ञान मंदिर विद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य आदरणीय बापूसो श्री पी डी चौधरी सर होते. व्यासपीठावर नूतन प्रायमरी इंग्लिश मीडियमच्या प्राचार्या सॅंड्रा मॅडम, उपप्राचार्य श्री प्रकाश राणे सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला



स्व अजितदादांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री पी डी चौधरी सर व सॅंड्रा मॅडम हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री प्रकाश राणे सर यांनी केले. अजितदादांची जयंती साजरी करण्यामागचा उद्देश त्यांनी सांगितला. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री पी डी चौधरी सर यांनी अजितदादांच्या जीवनाचा परिचय करून देताना विद्यार्थ्यांना अजितदादांचे स्वभाव वैशिष्ट्ये सांगून त्यांचा निर्भीड स्वभाव,स्पष्टवक्तेपणा, कामाची चिकाटी इत्यादी कार्यावर प्रकाशझोत टाकला. तसेच स्वर्गीय दादांनी महाराष्ट्राचे सर्वाधिक म्हणजे सहा वेळेस उपमुख्यमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली.बारामती मतदारसंघात अनेक वेळेस आमदार म्हणून ते निवडून आले. उपमुख्यमंत्र्यांसोबतच अर्थ,नियोजन, पाटबंधारे खाते यासारख्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या,याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी नूतन प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूलचे सर्व शिक्षक शिक्षकेतर बंधू भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक बंधू भगिनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

# ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाच्या नव्या कार्यकारिणीची निवड; विजयी पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव



**दैनिक युवक आधार**

**प्रसाद हनुमंते :** ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाच्या २०२६-२८ या द्वैवार्षिक कार्यकाळासाठी नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांवर विविध क्षेत्रांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी दिलीप शिंदे, कार्याध्यक्षपदी दीपक शेलार, उपाध्यक्षपदी निलेश मंडलिक, सचिवपदी राजीव डाके, सहसचिवपदी प्रसाद सकट आणि खजिनदारपदी राजेश शेटकर यांची निवड झाल्यानंतर राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.विशेष म्हणजे, महाराष्ट्राचे परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक, भाजपचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार रवींद्र चव्हाण, आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे तसेच ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपलोळकर यांनी नव्या कार्यकारिणीचे अभिनंदन करत आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. मान्यवरांनी पत्रकार संघाने पत्रकारांच्या हक्कांसाठी, व्यावसायिक विकासासाठी आणि समाजहिताच्या प्रश्नांवर अधिक प्रभावीपणे काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. नव्या नेतृत्वामुळे संघाची वाटचाल अधिक सक्षम आणि गतिमान होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.नवीन कार्यकारिणीने पत्रकारांच्या प्रश्नांना प्राधान्य देत संघटनेला अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला असून, सदस्यांच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे सांगितले.

# पेटीएमची मुख्य व्यवसायातून २०३ कोटींची विक्रमी नोंद

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** भारतातील आघाडीची डिजिटल पेमेंट्स आणि वित्तीय सेवा वितरण कंपनी पेटीएमने जून २०२६ अखेरच्या आर्थिक वर्ष २०२६–२७ ची प्रथम त्रैमासिक चे आर्थिक निकाल जाहीर केले आहेत. कंपनीने आतापर्यंतचा सर्वाधिक तिमाही २०३ कोटी नोंदवला असून, तो वार्षिक आधारावर १८२ टक्क्यांनी वाढला आहे.



मार्जिन ८ टाक्यापर्यंत पर्यंत वाढला आहे. करानंतरचा नफा ७९ टक्के वाढून २२० कोटी झाला आहे. व्यापारी आणि ग्राहक व्यवसायातील वाढ तसेच व्यवसायभर ए आय च्या वाढत्या वापरामुळे ऑपरेटिंग महसूल २८ टेक वाढून २४४८कोटी झाला. मर्चेंट जी एम व्हि ३१ टक्के वाढून ७.१ लाख कोटी झाला. वर्षभरात २७ लाख नवीन मर्चेंट्सची भर पडली. मर्चेंट कर्ज वितरण तसेच इक्विटी ब्रोकिंग आणि वेल्थ उत्पादनांमधील सुधारित उत्पन्नामुळे ही वाढ झाली. मासिक व्यवहार करणाऱ्या वापरकर्त्यांची संख्या ६० लाखांनी वाढून ८ कोटींवर पोहोचली.

# वारी : एक चालते बोलते विद्यापीठ

आज कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स आणि डिजिटल व्यवस्थापनाच्या युगातही वारी आपल्याला एक साधा पण अत्यंत प्रभावी संदेश देते; व्यवस्थापनाची खरी ताकद तंत्रज्ञानात नसते; ती माणसांच्या मनात असते. श्रद्धा, विश्वास, समता, सेवा आणि सामूहिक उत्तरदायित्व या मूल्यांवर उभी राहिलेली व्यवस्था शतकानुशतके टिकते. म्हणूनच वारकरी संप्रदायाची वारी ही केवळ धार्मिक परंपरा नाही; ती जगाला व्यवस्थापन, लोकसहभाग, मानवी मूल्ये आणि सामाजिक ऐक्य शिकवणारे चालते-बोलते विद्यापीठ आहे.ज्ञानोबा माऊली तुकाराम या अखंड नामघोषाने दुमदुमणारे महाराष्ट्राचे रस्ते, खांद्यावर भगवी पताका, गळयात तुळशीची माळ, कपाळी गोपीचंदनाचा टिळा, हातात टाळ-मृदंग आणि मुखी विठ्ठलनाम; हे दृश्य म्हणजे केवळ एक धार्मिक सोहळा नाही; तर भारतीय संस्कृतीतील शिस्त, समता, भक्ती आणि लोकव्यवस्थापनाचा अद्वितीय आविष्कार आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने लाखो वारकरी शेकडो किलोमीटरचा प्रवास करीत पंढरपूरच्या दिशेने चालत निघतात. हा प्रवास केवळ पायी चालण्याचा नसून; तो आत्मशुद्धीचा, समाजजागृतीचा आणि सामूहिक व्यवस्थापनाचा जीवनप्रवास आहे.

आज जगभरात मोठमोठे मेळावे, आंतरराष्ट्रीय परिषद, क्रीडा स्पर्धा, संगीत महोत्सव किंवा राजकीय कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान, हजारो कर्मचारी, प्रचंड आर्थिक तरतूद आणि विस्तृत नियोजन आवश्यक असते. मात्र महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाची वारी ही यापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. लाखो लोक स्वयंशिस्तीने, स्वयंप्रेरणेने आणि सेवाभावाने सहभागी होतात. कोणत्याही कठोर नियंत्रणाशिवाय, कोणत्याही वैयक्तिक स्वार्थाशिवाय आणि कोणत्याही दिखाव्याविना हा सोहळा शतकानुशतके यशस्वीपणे पार पडत आहे. व्यवस्थापनशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी जर



प्रत्यक्ष जीवनातील सर्वोत्तम केस स्टडी पाहायची असेल; तर वारीपेक्षा उत्कृष्ट उदाहरण दुसरे असू शकत नाही.

ध्येयाची एकता

वारीचे पहिले वैशिष्ट्य म्हणजे ध्येयाची एकता होय. लाखो व्यक्ती, विविध जाती, धर्म, भाषा, व्यवसाय, आर्थिक स्तर, वयोगट आणि सामाजिक पार्श्वभूमी असलेल्या लोकांचे अंतिम ध्येय पांडुरंगाचे दर्शन आणि नामस्मरण हे एकच असते. व्यवस्थापनशास्त्रात सांगितले जाते की, संस्थेचे उद्दिष्ट स्पष्ट असेल तर संघटन मजबूत होते. वारी हे याचे जिवंत उदाहरण आहे. येथे कोणी श्रीमंत नाही, कोणी गरीब नाही; कोणी मोठा नाही, कोणी लहान नाही. सर्वजण विठ्ठलाचे वारकरी या एका ओळखीने एकत्र येतात.

दिंडी व्यवस्थापन

वारीची दुसरी मोठी ताकद म्हणजे दिंडी व्यवस्थापन होय. प्रत्येक दिंडी ही स्वत:मध्ये एक सुबक संघटना असते. दिंडीमध्ये प्रमुख, उपप्रमुख, भजनकार, भोजनव्यवस्था पाहणारे, वैद्यकीय मदत करणारे, शिस्त राखणारे आणि इतर स्वयंसेवक अशी कार्यविभागणी असते. प्रत्येकाची जबाबदारी निश्चित असते. कोणतेही लिखित आदेश नसतानाही प्रत्येकजण आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडतो. आधुनिक व्यवस्थापनातील जबाबदारीचे सोपवणूक आणि संघ समन्वय यांची ही अत्यंत प्रभावी प्रात्यक्षिके आहेत.

वेळेचे व्यवस्थापन

वारीमध्ये वेळेचे व्यवस्थापन विशेष उल्लेखनीय आहे. पहाटे काकड आरतीपासून दिवसाची सुरुवात होते. ठरावीक वेळेत प्रस्थान, मधील विश्रांती, भोजन, भजन, कीर्तन आणि मुक्काम यांचे नियोजन काटेकोरपणे पाळले जाते. लाखो लोकांचा सहभाग असूनही वेळेचे हे भान विलक्षण आहे. वेळेचा आदर हा वारीच्या संस्कारांचा अविभाज्य भाग आहे.

शिस्त

शिस्त हा वारीचा आत्मा आहे. पोलिसांचा धाक, दंडाची भीती किंवा कठोर नियम यामुळे नव्हे; तर अंत:करणातील श्रद्धेमुळे शिस्त पाळली जाते. प्रत्येक वारकरी दुसऱ्याचा विचार करतो. रस्त्यावर कचरा टाकू नये, दुसऱ्याला त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी, वृद्धांना मदत करावी, महिलांचा सन्मान राखावा आणि सामूहिक हिताला प्राधान्य द्यावे; हे सारे कोणत्याही प्रशिक्षणाशिवाय अंगिकारलेले दिसते. हीच खरी स्वयंशिस्त आहे.

सेवाभावाचे व्यवस्थापन

वारीतील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सेवाभावाचे व्यवस्थापन होय. मार्गावर असंख्य ग्रामस्थ, संस्था, स्वयंसेवी संघटना आणि सामाजिक कार्यकर्ते वारकऱ्यांसाठी पिण्याचे पाणी, अन्न, औषधे, विश्रांती, वैद्यकीय सेवा आणि निवाऱ्याची व्यवस्था करतात. विशेष म्हणजे ही सेवा प्रसिद्धीसाठी नसते; ती कर्तव्यभावनेतून आणि भक्तीभावनेतून केली जाते. सेवा हीच ईश्वरपूजा हा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरलेला दिसतो.

समतेचा सर्वोच्च संदेश

वारी समतेचा सर्वोच्च संदेश देते. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत चोखामेळा, संत सावता माळी, संत गोरा कुंभार, संत जनाबाई, संत सेना महाराज यांसारख्या संतांनी समाजातील भेदाभेद नाकारून भक्तीचा समान अधिकार सर्वांना दिला. त्या विचारांचे प्रत्यक्ष दर्शन वारीमध्ये घडते. एका रांगेत शेतकरी, शिक्षक, डॉक्टर, अभियंता, उद्योगपती, मजूर आणि विद्यार्थी चालतात. भोजनाच्या पंगतीत कोणताही भेदभाव नसतो. ही समता केवळ घोषणेत नाही; ती जीवनपद्धतीत आहे.

पर्यावरण-जागरूकतेचाही संदेश

वारी ही पर्यावरण-जागरूकतेचाही संदेश देते. अनेक दिंड्या आज प्लास्टिकमुक्त वारी, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, जलसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाचे संदेश देत आहेत. श्रद्धेबरोबर सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य वारीमधून घडत आहे.यंदाच्या काळात प्रशासन, पोलीस, आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि वारकरी संघटना यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी झालेला दिसतो. डिजिटल तंत्रज्ञान, वैद्यकीय सुविधा, आपत्कालीन मदत, वाहतूक नियोजन आणि स्वच्छता व्यवस्थापन यामुळे वारी अधिक सुरक्षित आणि सुसंघटित होत आहे. परंपरा आणि आधुनिक व्यवस्थापन यांचा सुंदर संगम घडताना दिसतो.तथापि; वाढती गर्दी, पर्यावरणीय ताण, प्लास्टिक कचरा, वाहतूक कोंडी आणि हवामानातील बदल यांसारखी आव्हानेही आहेत. या आव्हानांवर मात करण्यासाठी प्रत्येक वारकऱ्याने स्वत:ला जबाबदार व्यवस्थापक समजणे आवश्यक आहे. स्वच्छता, पाण्याची बचत, शिस्त, पर्यावरणपूरक साहित्याचा वापर आणि प्रशासनाला सहकार्य ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. आज कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स आणि डिजिटल व्यवस्थापनाच्या युगातही वारी आपल्याला एक साधा पण अत्यंत प्रभावी संदेश देते; व्यवस्थापनाची खरी ताकद तंत्रज्ञानात नसते; ती माणसांच्या मनात असते. श्रद्धा, विश्वास, समता, सेवा आणि सामूहिक उत्तरदायित्व या मूल्यांवर उभी राहिलेली व्यवस्था शतकानुशतके टिकते. म्हणूनच वारकरी संप्रदायाची वारी ही केवळ धार्मिक परंपरा नाही; ती जगाला व्यवस्थापन, लोकसहभाग, मानवी मूल्ये आणि सामाजिक ऐक्य शिकवणारे चालते-बोलते विद्यापीठ आहे. जय जय राम कृष्ण हरी .....

**विद्यावाचस्पती विद्यानंद**




# पावसाची पाखरं



"पेर्ते व्हा... पेर्ते व्हा..." अशी शीळ घालणारा पक्षी, फक्त पावसाचं पाणी पितो अशी समजूत असलेला चातक आणि इंद्रधनुष्यासारख्या रंगांचा तिबोटी खंड्या... या तिघांमध्ये एक समान गोष्ट आहे. ती कोणती? चला, जाणून घेऊया पावसाच्या पाखरांची रंजक दुनिया!

उन्हाळ्याच्या गरमागरम वातावरणानंतर आकाशात काळे काळे मेघ जमायला जरी लागले तरी मनाला गारवा मिळतो. हा अनुभव फक्त माणसांचाच नाही तर अवघ्या सृष्टीचाच असतो. पावसाचं आगमन आपल्या ओरडण्यातून जाहीर करणारे बेडूक असोत किंवा पावसाच्या शिडकाव्यामुळे हलके हलके डोकं वर काढणाऱ्या मशरुम्स असोत यांचं जसं पावसाशी नातं आहे त्याचप्रमाणे पक्ष्यांच्या जगातील अनेक भिडू आहेत ज्यांचं आणि पावसाचं काही वेगळंच नातं असतं. ते नातं इतकं घट्ट असतं की या पक्ष्यांना 'पावसाची पाखरं' म्हणूनच ओळखतात.

या पावसाच्या पाखरांमध्ये सगळ्यात आधी उल्लेख करावा लागतो तो 'पावशा' पक्ष्याचा. येऊ घातलेल्या पावसाची सूचना शेतकऱ्यांना देण्यासाठी पावशा प्रसिद्ध आहे. साधारणतः एप्रिलपासून पावशा ठिकठिकाणी 'पेर्ते व्हा... पेर्ते व्हा... पेर्ते व्हा' अशी शीळ घालत शेतकऱ्यांना, 'चला पाऊस जवळ आलाय, आता पेरणीची तयारी करा' म्हणून सूचना देताना पाहायला (खरंतर 'ऐकायला'!) मिळतो आणि म्हणून महाराष्ट्रात याला 'पावशा' म्हणतात. इंग्रजांनी या देशात आल्यावर जेव्हा पावशाची शीळ ऐकली जी सुरुवातीला लहान असते आणि नंतर वाढत वाढत दीर्घ होत जाते. त्यामुळे सतत ऐकून ऐकून जणू डोकेदुखीच होते अशी भावना गोऱ्या साहेबांची झाली, शिवाय या शिळेतून त्यांना 'ब्रेन फिवर... ब्रेन फिवर' असे शब्द ऐकायला आले आणि त्यांनी या पक्ष्याचं नाव ठेवलं 'ब्रेन फिवर बर्ड'. हिंदी भाषा जिथे बोलली जाते त्या उत्तर भारतात याच पक्ष्याची शीळ 'पियां कहां?... पियां कहां?...' अशी ऐकली जाते आणि त्यावरून या पक्ष्याला 'पपिहा' असे म्हणतात.

पावशा पक्ष्याचे इंग्रजी नाव आहे 'कॉमन हॉक कक्कू'. आपल्या ओळखीच्या कोकिळा पक्ष्याच्या 'कुकुलिडे' फॅमिलीतच कॉमन हॉक कक्कूचा समावेश होतो. हा पक्षी दिसायला काहीसा 'शिक्रा' या शिकारी पक्ष्यासारखा असतो. त्यामुळेच 'हॉक' म्हणजे ससाण्यासारखा दिसणारा म्हणून 'हॉक कक्कू' असे नाव मिळाले आहे. पावशा भारतात राजस्थान, काश्मीर आणि इशान्य भारताचा काही भाग वगळता उर्वरित सगळ्या राज्यांमध्ये पाहायला मिळतो. विणीच्या हंगामात सतत ओरडणारा पावशा हिवाळ्यात मात्र कोकिळेप्रमाणेच गप्प असतो. कोकिळेच्या वर्गातला असल्याने कोकिळेसारखाच पावशादेखील 'ब्रूड पॅरासाइट' आहे. अर्थात हा पक्षी देखिल स्वतःचे घरटे न बनवता आपले अंडे दुसऱ्या पक्ष्याच्या घरट्यात घालतो.मार्च ते जून हा पावशाचा विणीचा हंगाम असतो. हाच काळ 'कॉमन बॅबलर ' म्हणजे 'रानभाई' पक्ष्याचा ही विणीचा आहे,पावशा आपले अंडे कॉमन बॅबलरच्या घरट्यात शिताफीने घालतो आणि कॉमन बॅबलर (रानभाई) पावशाचे पिल्लू वाढवतो. तसेच काही वेळा कृष्ण थिरथिरा(ब्लॅक रेडस्टार्ट ) किंवा नर्तक (फ्लायकॅचर) या पक्ष्यांच्या घरट्यातही आपली अंडी घालतो.

पावशा पक्ष्याप्रमाणेच पावसाशी ज्याचं नाव जोडलेलं आहे असा पक्षी म्हणजे चातक. संस्कृत आणि मराठी साहित्यात हा पक्षी प्रसिध्द आहे तो 'फक्त पावसाचं पाणी पिणारा पक्षी ' म्हणून. प्रत्यक्षात असं काही नसतं. चातक हा सुध्दा पावशा प्रमाणेच कक्कू कुळातील पक्षी आहे. याच्या तीन उपजाती आहेत पायका,सिरेट्स आणि याकोबिनस. सिरेट्स ही जात आफ्रिकेतून उत्तर भारतात स्थलांतर करुन येते. याकोबिनस ही जात दक्षिण भारतात आढळते.जॅकोबिन कक्कू,पाइड कक्कू किंवा पाइड क्रेस्टेड कक्कू या इंग्रजी नावांनी तो ओळखला जातो. डोक्यावरचा काळा तुरा,पंखांवरचा पांढरा पट्टा आणि पांढऱ्या टोकाची लांब शेपटी यामुळे चातक नजरेत भरतो. विणीच्या हंगामात हे पक्षी एकमेकांचा पाठलाग करत, जोरदार गोंगाट करतात.कोकिळेच्या कुळातला असल्याने चातक सुध्दा आपली अंडी स्वतः उबवत नाही.तो सातभाईंच्या घरट्यात आपले अंडे घालतो आणि नंतर त्यातून बाहेर आलेले पिल्ली सातभाई वाढवतात.

पावसाळ्याशी नातं जुळलेला आणि पक्षि निरिक्षकांमध्ये अतिशय लोकप्रिय असलेला पक्षी म्हणजे 'तिबोटी खंड्या '.अलिकडे ' ओ डी के एफ ' अर्थात ओरिएंटल ड्वार्फ किंगफिशर या नावाने हा पक्षी वन्यजीव छायाचित्रकारांमध्ये विशेष प्रसिध्द झाला आहे. यालाच 'श्री टोड किंगफिशर' आणि 'ब्लॅक बॅक्ड किंगफिशर' अशीही नावे आहेत. भारतात आढळणाऱ्या बारा प्रकारच्या खंड्यांमधील हा खंड्या आकाराने सर्वात लहान असतो मात्र याच्या अंगावर लाल,पिवळा, नारिंगी, निळा, किरमिजी, काळा, पांढरा अशी रंगपंचमीच पाहायला मिळते. इतर खंड्यांपेक्षा याचं सर्वात मोठं वेगळेपण म्हणजे हा वर्षातला काही काळ स्थानिक स्थलांतर करताना पाहायला मिळतो.

या खंड्याचे एक शारीरिक वैशिष्ट्य म्हणजे याच्या पायाला तीनच बोटं असतात,दोन पुढे आणि एक मागे, म्हणून याला तिबोटी खंड्या किंवा थ्री टोड किंगफिशर म्हणतात. अल्सेडिनिडे कुळातील हा खंड्या प्रामुख्याने पाणथळींजवळ आणि दाट वनांच्या भागात पाहायला मिळतो. भारतामध्ये हा खंड्या पावसाळ्यात संपूर्ण कोकण किनाऱ्यावरच्या जंगलांमध्ये दिसून येतो. पावसाळा संपल्यानंतर मात्र हा दक्षिणेकडे स्थलांतर करतो. भारताबाहेर बांग्लादेश, भूतान, म्यानमार, चीन, कम्बोडिया, मलेशिया, श्रीलंका, व्हिएतनाम, फिलिपाइन्स या देशांमध्ये पाहायला मिळतो. नदी-ओढ्याकाठचे अरण्य,खारफुटी यात राहाणारा हा पक्षी रानातील वाहते झरे,ओढे,डबकी यांच्याजवळ आढळतो.

महाराष्ट्रात जुलै ते सप्टेंबर हा तिबोटी खंड्याचा विणीचा हंगाम असतो. इतर खंड्यांप्रमाणेच हा देखिल जमिनीत बीळ खोदून आपले घरटे थाटतो. एखाद्या ओढ्याजवळ किंवा नदीच्या काठावरच्या मातीच्या दरडीमध्ये सुमारे एक मीटर लांबीचे बीळ खोदून त्यात हा अंडी घालतो. हे बिळातले घरटे नर आणि मादी मिळून बनवतात. एकावेळी मादी तीन ते सहा अंडी घालते. नर आणि मादीमिळून आळीपाळीने अंडी उबवतात. साधारण सतरा-अठरा दिवसांमध्ये अंड्यातून पिल्ले बाहेर येतात. पुढचे एकोणीस - वीस दिवस नर-मादी मिळून पिल्लांना भरवतात आणि वाढवतात. वाढ पूर्ण झाल्यानंतर पिल्ले घरट्याबाहेर येऊन उडून जातात. पिल्लांचे संगोपन करत असताना नर आणि मादी घरट्याजवळच्या एखाद्या फांदीवर क्षणभर विसावतात, त्यामुळे या काळात त्यांचे छायाचित्रण करणे तुलनेनं सोपं जातं.

पावसाळ्यात किटकांची पैदास मोठ्या प्रमाणावर होत असल्याने पक्ष्यांना खायला विपुल अन्न उपलब्ध असते,त्यामुळे खरतर सगळेच पक्षी पावसाच्या आगमनाने सुखावतात. मात्र चातक,पावशा अशा काही पक्ष्यांचं नाव पावसाशी असं जोडलेलं आहे की आओपापच त्यांना पावसाची पाखरं म्हणावसं वाटतं.

**मकरंद जोशी**
**निसर्ग अभ्यासक व लेखक**

# महिनाभर फक्त सलाड खाल्ल्यास शरीरात काय बदल होतात?

आजकाल वजन कमी करण्यासाठी अनेक महागडे डाएट फॉलो केले जातात. यामध्ये सध्या 30 दिवस फक्त सॅलड डाएटची मोठी क्रेझ पाहायला मिळत आहे. या डाएटमध्ये सलग अनेक दिवस फक्त फळे आणि कच्च्या भाज्यांचा सलाड खाल्ले जाते. पण, महिनाभर केवळ कच्च्या भाज्या आणि सलाडवर राहिल्याने शरीरावर नेमका काय परिणाम होतो? पाहूयात सविस्तरपणे...



**झपाट्याने वजन कमी होणे**

सलाडमध्ये कॅलरीजचे प्रमाण खूप कमी आणि फायबरचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे सलग महिनाभर फक्त सलाड खाल्ल्यास शरीरातील कॅलरीचे प्रमाण घटते आणि सुरुवातीला वजन वेगाने कमी होते.

**पचनक्रियेतील बदल**

सलाडमधील फायबरमुळे पचनसंस्था सुरुवातीला सक्रिय होते आणि बद्धकोष्ठतेची समस्या दूर होऊ शकते. मात्र, अतिप्रमाणात कच्चे फायबर खाल्ल्याने काही दिवसांनी पोट फुगणे, गॅस होणे अशा समस्या उद्भवू शकतात.

**अशक्तपणा आणि थकवा**

फक्त सलाड खाल्ल्याने शरीराला आवश्यक तेवढे प्रोटिन, निरोगी चरबी आणि कार्बोहायड्रेट्स मिळत नाहीत. यामुळे शरीरातील ऊर्जेची पातळी खालावते आणि सतत थकवा, अशक्तपणा जाणवतो.

**स्नायूंचे नुकसान**

प्रोटीनच्या कमतरतेमुळे शरीर चरबीसोबतच स्नायू वापरण्यास सुरुवात करते. यामुळे वजन कमी झाले तरी शरीर टोन न राहता सैल पडू शकते.

**पोषक तत्वांची कमतरता**

सतत कच्चे अन्न खाल्ल्याने व्हिटॅमिन B12, आयर्न आणि कॅल्शियमची गंभीर कमतरता निर्माण होऊ शकते. तसेच, यामुळे केस गळणे आणि त्वचेचा टवटवीतपणा कमी होणे अशा समस्या सुरू होतात.

**तज्ज्ञ काय सांगतात?**

सलाड हे आरोग्यासाठी नक्कीच उत्तम आहे, परंतु कोणत्याही एकाच अन्नावर महिनाभर राहणे शरीरासाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे कोणताही मोठा डाएट प्लॅन सुरू करण्यापूर्वी आहारतज्ज्ञांचा सल्ला नक्की घ्या.

# वयाच्या ४५ नंतरची लाईफस्टाईल

वयाच्या ४५ वर्षांनंतर आयुष्याचा एक नवा टप्पा सुरू होतो. या काळात दांपत्याने केवळ शारीरिक आरोग्याचाच नाही, तर मानसिक, भावनिक आणि आर्थिक आरोग्याचाही विचार करणे गरजेचे असते. कारण या वयातच योग्य जीवनशैली स्वीकारल्यास हा काळ अधिक आनंदी, निरोगी आणि समाधानकारक ठरू शकतो. या वयापर्यंत संसारही बऱ्यापैकी झालेला असतो. पैशाचे , नातेसंबंधाचे महत्वही समजलेले असते. मुलं बऱ्यापैकी मोठी व शहाणी झालेली असतात. आजच्या काळात तर मुलं भावनेपेक्षा व्यवहारांना जास्त महत्व देतात. त्यामुळे आईवडिलांनीही अनावश्यक खर्च टाळावा. पूर्वीप्रमाणे पार्टया, कार्यक्रम, गावजेवणावरचा खर्च टाळावा. भपकेबाजपणाच्या मागे लागून जमा असलेले पूंजी वाया घालवू नये. मुलांनाही आर्थिक शिस्तीचे महत्व सांगावे. साधे सरळ जीवन जगावे. म्हणजे कधीही कोणापुढेही हात पसरण्याची वेळ येत नाही. वयाची पंचेचाळीशी



ही उतारवयाची सुरुवात नसून, अधिक परिपक्व, समंजस आणि आनंदी सहजीवनाचा नवा अध्याय असू शकतो. निरोगी आरोग्य, सुदृढ नाते, योग्य आर्थिक नियोजन आणि सकारात्मक विचार यांमुळे हा प्रवास अधिक सुंदर बनतो.

**१. आरोग्य**

संतुलित आणि पौष्टिक आहार घ्या.दररोज किमान ३० ते ४५ मिनिटे चालणे, योग, पोहणे किंवा सायकलिंग करा. नियमित आरोग्य तपासण्या करून रक्तदाब, रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉलची तपासणी करा. दररोज ७ ते ८ तासांची शांत झोप घेणे महत्वाचे असते.

**२. नाते**

दररोज काही वेळ एकमेकांसाठी राखून ठेवा.मनातील भावना, अपेक्षा आणि भविष्यातील योजना यांबद्दल मोकळेपणाने संवाद साधा.एकमेकांचे कौतुक करा आणि छोट्या-छोट्या गोष्टींमधून प्रेम व्यक्त करा. अधूनमधून फिरायला जा, छंद जोपासा आणि एकत्र नवीन अनुभव घ्या.

**३. आर्थिक नियोजन**

निवृत्तीचे नियोजन वेळेत सुरू करा.आरोग्य विमा आणि आपत्कालीन निधी तयार ठेवा.अनावश्यक कर्ज टाळा आणि भविष्यातील खर्चाचा विचार करून बचत करा.

**४. मानसिक आणि भावनिक आरोग्य जपा**

ध्यान, प्राणायाम किंवा मेडिटेशनचा सराव करा.मित्र-मैत्रिणी आणि कुटुंबीयांशी नियमित संपर्क ठेवा.नवीन कौशल्ये शिका, पुस्तके वाचा किंवा आवडीचे छंद जोपासा.तणावाच्या काळात एकमेकांना दोष देण्याऐवजी आधार द्या.

**५. सक्रिय आणि आनंदी राहा**

शक्य असल्यास प्रवास करा.समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सहभागी व्हा. मुलं आणि नातवंडांसोबत वेळ घालवा, पण स्वतःच्या आवडी-निवडीही जपा.

**६. वैवाहिक जवळीक जपा**

वय वाढले तरी प्रेम, आपुलकी आणि शारीरिक जवळीक यांचे महत्त्व कमी होत नाही.आरोग्याशी संबंधित अडचणी असल्यास त्याबद्दल मोकळेपणाने चर्चा करा आणि गरज भासल्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्या.

# किडनीचा कॅन्सर झाल्यावर दिसतात 'ही' ५ भयंकर लक्षणं; चुकूनही करू नका दुर्लक्ष, पाणीही पचवणं होईल मुश्किल

मूत्रपिंड हा एक असा अवयव आहे, जो समस्या निर्माण करू शकतो आणि संपूर्ण शरीराला संभाव्यतः हानी पोहोचवू शकतो; त्यामुळे मूत्रपिंडाचा कर्करोग झाल्यास त्याची लक्षणे लवकर ओळखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मूत्रपिंडाच्या कर्करोगाची लक्षणे सहसा लक्षणविरहित असतात, म्हणजेच ती लगेच ओळखली जात नाहीत. मूत्रपिंडाच्या कर्करोगामुळे सुरुवातीला सहसा वेदना होत नाहीत आणि जेव्हा वेदना सुरू होतात, तेव्हा कर्करोग मोठ्या प्रमाणात वाढलेला असतो. मूत्रपिंडाच्या कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे कोणती आहेत आणि डॉक्टरांना केव्हा भेटणे महत्त्वाचे आहे, याबद्दल जाणून घ्या.



**किडनीच्या कर्करोगाची लक्षणे कशी दिसतात?**

**लघवीमध्ये रक्त**

लघवीतून रक्त येणे हे किडनीच्या कर्करोगाचे सर्वात सामान्य आणि स्पष्ट लक्षण आहे. जर लघवीचा रंग गडद, लाल दिसत असेल किंवा लघवीमध्ये रक्ताचे थेंब दिसत असतील तर त्याकडे दुर्लक्ष करू नये.

**सतत वजन कमी होणे**

जर तुमचे वजन अनाकलनीयपणे किंवा सातत्याने कमी होत असेल तर ते कर्करोगाचे लक्षण असू शकते. कर्करोगाच्या पेशी शरीराची ऊर्जा वापरून टाकतात, ज्यामुळे वजन कमी होते.

**भूक न लागणे**

भूक न लागणे किंवा खाण्याची इच्छाच न होणे हे कर्करोगाचे लक्षण असू शकते. किडनीच्या ट्यूमरमुळेदेखील रुग्णाची भूक मंदावू शकते.

**रक्तस्राव**

मूत्रपिंडे असे संप्रेरक (हार्मोन्स) तयार करतात, जे शरीराला लाल रक्तपेशी बनवण्यास मदत करतात. कर्करोग या प्रक्रियेत अडथळा आणतो, ज्यामुळे ॲनिमिया (रक्तक्षय) होतो.

**पाठीच्या खालच्या भागात गाठ**

कमरेच्या अगदी वरच्या भागात एक गाठ तयार होऊन ती सुजते. हे ट्यूमरचे लक्षण असू शकते.

**थकल्यासारखे वाटणे**

रात्री पूर्ण झोप घेऊनही दिवसभर शरीर थकलेले, सुस्त आणि अशक्त राहत असेल तर हे देखील किडनी ट्यूमरचे लक्षण असू शकते.

**सतत ताप**

किडनीच्या कर्करोगामुळे कोणतीही बाह्य लक्षणे नसतानाही ताप येऊ शकतो. जर तुम्हाला सतत सौम्य किंवा जास्त ताप येत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. किडनीच्या कर्करोगात ताप सहसा रात्री येतो.

**तुम्ही डॉक्टरांना कधी भेटायला पाहिजे?**

येथे नमूद केलेल्या किडनी कॅन्सरच्या लक्षणांपैकी कोणतेही लक्षण आढळल्यास, मूत्ररोग तज्ज्ञाचा सल्ला घ्या. मूत्ररोग तज्ज्ञ किंवा सामान्य डॉक्टर योग्य तपासणी करून तुम्हाला कॅन्सर आहे की नाही याची खात्री करू शकतात.

# सलग ३० दिवस पोळी खाणं बंद केलं तर शरीरात नेमकं काय होतं?

भारतात पोळी मोठ्या आवडीने खाल्ली जाते, विशेषतः गव्हाची पोळी. गव्हाच्या पोळीतून शरीराला कार्बोहायड्रेट, फायबर, व्हिटॅमिन बी आणि इतर अनेक आवश्यक पोषक घटक मिळतात. मात्र, आजकाल वजन कमी करण्यासाठी किंवा लो-कार्ब डाएट पाळणारे अनेकजण पोळी पूर्णपणे खाणं बंद करतात. अशा वेळी प्रश्न पडतो की, एखाद्या व्यक्तीने सलग ३० दिवस पोळी खाल्ली नाही तर शरीरावर त्याचा काय परिणाम होऊ शकतो? जाणून घेऊया त्याचे काही संभाव्य फायदे आणि परिणाम.

**वजन कमी होणे**

पोळी खाणं बंद केल्यावर शरीरात कार्बोहायड्रेटचे प्रमाण कमी होते. त्यामुळे शरीर आधी ग्लायकोजनचा वापर करते. ग्लायकोजनसोबत शरीरातील पाणीही कमी होत असल्यामुळे सुरुवातीच्या २ आठवड्यांत वजन झपाट्याने कमी झाल्यासारखे दिसू शकते.

**शरीरात अशक्तपणा जाणवणे**

कार्बोहायड्रेट हे शरीराला ऊर्जा देतात. जर पोळी बंद करून त्याऐवजी कार्बोहायड्रेटयुक्त इतर पौष्टिक पदार्थ खाल्ले नाहीत, तर थकवा, अशक्तपणा, चक्कर येणे किंवा सुस्ती जाणवू शकते.

**बद्धकोष्ठतेची समस्या**

पोळी सोडल्यानंतर आहारात फायबरचा समावेश केला नाही तर पोटाच्या तक्रारी वाढू शकतात. त्यामुळे बद्धकोष्ठता, गॅस आणि पोट फुगण्यासारख्या समस्या होऊ शकतात. म्हणून पोळी सोडल्यास आहारात फायबरयुक्त पदार्थांचा समावेश करणे गरजेचे आहे.

**रक्तातील साखरेवर परिणाम**

मैद्यापासून बनवलेल्या पदार्थांच्या तुलनेत गव्हाची पोळी हळूहळू पचते. जर पोळीच्या जागी जास्त प्रथिने आणि हेल्दी फॅट असलेले पदार्थ खाल्ले, तर काही लोकांमध्ये रक्तातील साखर नियंत्रणात राहण्यास मदत होऊ शकते.

**पोषक घटकांची कमतरता होण्याचा धोका**

गव्हाच्या पोळीत फायबर, लोह, मॅग्नेशियम आणि बी-व्हिटॅमिनसारखे अनेक पोषक घटक असतात. त्यामुळे पोळी बंद केल्यानंतर आहारात हे पोषक घटक मिळतील असे इतर आरोग्यदायी पदार्थ समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यामुळे पोटही जास्त वेळ भरलेले राहते.

**पोळी सोडणे योग्य आहे का?**

जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल, तर फक्त पोळी सोडून उपयोग होणार नाही. त्यासाठी नियमित व्यायाम किंवा योग करणे आणि योग्य प्रमाणात कॅलरी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.